मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २५९ | मंगळवार, ०२ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर समाजसेवेचा अखंड दीपस्तंभ











**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** समर्पण... हा शब्द केवळ भावना व्यक्त करणारा नाही, तर आयुष्यभर जगण्याचा एक संस्कार आहे. स्वतःचे आयुष्य, बुद्धी, श्रम, संपत्ती आणि वेळ समाजाच्या कल्याणासाठी अर्पण करणे म्हणजे समर्पण. अनेक व्यक्ती समाजात मोठ्या पदांवर पोहोचतात, संपत्ती कमावतात, प्रसिद्धी मिळवतात; पण स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी जगणारी माणसे फारच थोडी असतात. अशा दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे दानशूर व्यक्तिमत्त्व, लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर साहेब.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे आपल्या आयुष्याची ७५ वर्षे अर्थात अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण करीत आहेत. ही केवळ वाढदिवसाची औपचारिकता नसून, समाजसेवेच्या सुवर्णमय प्रवासाचा गौरवशाली टप्पा आहे. जवळपास पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजहितासाठी समर्पित केले. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, वैद्यकीय, अध्यात्मिक आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान आज समाजासाठी कायम प्रेरणादायी असे आहे. शंभरामध्ये एक शूर, हजारामध्ये एक पंडित, दहा हजारामध्ये एक वक्ता आणि लाखामध्ये एखादा दाता असतो," असे आपल्या संस्कृतीत म्हटले जाते. समाजाला असा दाता आणि लोकनेता रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने लाभला, हे समाजाचे भाग्यच म्हणावे लागेल. त्यांचे कार्य केवळ मदतीपुरते मर्यादित नाही, तर माणसाच्या दुःखाशी एकरूप होऊन त्याला आधार देण्याचे आहे. त्यांच्या कार्यामागे प्रसिद्धीची अपेक्षा नाही; तर माणुसकी जपण्याची तळमळ आहे.

"उघडले भांडार, धन्याचा माल, मी तो हमाल भारवाही" या संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातील भावार्थ त्यांनी आपल्या जीवनातून साकारला आहे. "आपल्याजवळ असलेली संपत्ती ही समाजाची ठेव आहे," या विचाराने त्यांनी गरिब, पीडित, शोषित, कष्टकरी आणि वंचित घटकांसाठी सातत्याने मदतीचा हात दिला. अनेकांच्या शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी, घरासाठी, रोजगारासाठी आणि जीवन उभे करण्यासाठी त्यांनी निस्वार्थ मदत केली. म्हणूनच त्यांच्या दातृत्वाचा गौरव केवळ एका भागापुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचला. राजकीय क्षेत्रात अनेक नेते निर्माण होतात; पण जनतेच्या मनात स्थान निर्माण करणारे लोकनेते अत्यंत दुर्मिळ असतात. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील लोकनेते आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सत्ता, संपत्ती आणि लोकप्रियता असूनही अहंकाराचा लवलेश नाही. समाजकारण हा त्यांच्या जीवनाचा गाभा आहे. लोकांची अडचण सोडवणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणे हे त्यांनी आयुष्यभर केले. त्यांच्या दारात आलेली व्यक्ती रिकाम्या हाताने परत गेली नाही, हे लोक आजही अभिमानाने सांगतात. एखाद्या रुग्णाला उपचारासाठी मदत असो, गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधार असो, क्रीडापटूंना प्रोत्साहन असो किंवा सांस्कृतिक उपक्रमांना मदत असो लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर यांनी प्रत्येक क्षेत्राला आपुलकीने हातभार लावला. त्यांच्या सामाजिक कार्याचा विस्तार अत्यंत व्यापक आहे. गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, आधुनिक शिक्षण ग्रामीण भागात पोहोचावे आणि समाजातील प्रत्येक मुलाला संधी मिळावी यासाठी त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या शैक्षणिक संस्था आज हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत आहेत. इंग्रजी शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण गावागावात पोहोचविण्याचे कार्य त्यांनी दूरदृष्टीने केले. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे. "कमवा आणि शिका" या तत्त्वावर त्यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आयुष्यभर जपला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे, या विचाराने त्यांनी शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणावर मदत केली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून अनेक शाळा, महाविद्यालये आणि वास्तूंना त्यांचे नाव देण्यात आले, ही त्यांच्या योगदानाची समाजाने दिलेली पोचपावती आहे. स्वतःची शिक्षण संस्था असतानाही रयत शिक्षण संस्था त्यांनी मातृसंस्था मानून कार्य केले आहे. कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रांबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक राहिली. ग्रामीण भागातील कलावंतांना व्यासपीठ मिळावे, युवकांना क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी आणि सांस्कृतिक परंपरा जपल्या जाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने मदत केली. अनेक क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, कला उपक्रम आणि युवक विकास कार्यक्रमांना त्यांनी उदारपणे सहकार्य केले. समाजातील युवकांनी सकारात्मक मार्ग निवडावा आणि समाजहिताचे कार्य करावे, यासाठी त्यांनी कायम प्रेरणा दिली. वैद्यकीय क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या अनेक रुग्णांना त्यांनी मदत केली. वैद्यकीय शिबिरे, आरोग्य सेवा, रुग्णालयांना मदत आणि गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी त्यांनी केलेले कार्य अनेक कुटुंबांसाठी जीवनदायी ठरले. संकटकाळात मदतीसाठी धावून जाणारा नेता म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली. नैसर्गिक आपत्ती, पूर, दुष्काळ किंवा इतर संकटांच्या काळात त्यांनी समाजासाठी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य उभे केले. संकटात सापडलेल्या लोकांसाठी अन्नधान्य, आर्थिक मदत आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून त्यांनी दिलासा दिला. समाजातील तळागाळातील घटकांसाठी त्यांची संवेदनशीलता आजही तितकीच कायम आहे.

**"त्यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रभावी, तितकेच साधे आणि सहज आहे. श्रीमंती असूनही साधेपणा, लोकप्रियता असूनही विनम्रता आणि सत्ता असूनही माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांचे बोलणे, वागणे, लोकांशी जोडून घेण्याची पद्धत आणि प्रत्येकाच्या दुःखात सहभागी होण्याची वृत्ती यामुळेच ते जनमानसात घर करून आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पद्मश्री कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येतो. सामाजिक न्याय, शिक्षण, समानता आणि लोककल्याण या मूल्यांना त्यांनी आयुष्यभर जपले. त्यांच्या या प्रदीर्घ प्रवासात त्यांना कुटुंबाचीही मोलाची साथ लाभली. पत्नी आदरणीय शंकुतला रामशेठ ठाकूर यांचे सहकार्य, आमदार प्रशांत ठाकूर व युवा नेते परेश ठाकूर यांची साथ, तसेच आई-वडील आणि जनार्दन भगत साहेबांचे संस्कार हे त्यांच्या कार्यामागील प्रेरणास्थान राहिले. आज लोकनेते रामशेठ ठाकूर अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण करत असताना त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे समाजसेवेच्या एका महान परंपरेचा सन्मान आहे. त्यांनी केलेले कार्य हे केवळ एका व्यक्तीचे यश नसून, संपूर्ण समाजाला दिशा देणारे प्रेरणादायी पर्व आहे. त्यांच्या समर्पणाची, दातृत्वाची, लोकसेवेची आणि माणुसकीची ही अखंड ज्योत पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर हे केवळ एक राजकीय किंवा सामाजिक नेते नसून, ते लोकांच्या सुखदुःखात सदैव धावून जाणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाची सुरुवात अत्यंत साध्या वातावरणातून झाली. सामान्य माणसांच्या अडचणी, गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न त्यांनी जवळून अनुभवले. त्यामुळे समाजासाठी काहीतरी मोठे करण्याची प्रेरणा त्यांच्या मनात लहानपणापासूनच निर्माण झाली. समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. जनतेशी असलेली त्यांची जवळीक, लोकांप्रती असलेली आत्मीयता आणि समस्यांवर तत्काळ उपाय शोधण्याची वृत्ती यामुळे ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले. त्यांच्या नेतृत्वात नेहमीच साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कार्यकर्त्यांप्रती आत्मीयता दिसून आली. त्यांनी समाजसेवेला केवळ उपक्रमांपुरते मर्यादित ठेवले नाही, तर ती लोकचळवळ बनवली. त्यांच्या कार्यामुळे हजारो कुटुंबांना नवे आयुष्य मिळाले आणि अनेक युवकांना जीवनाची दिशा मिळाली. "शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे" या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले आणि विविध क्षेत्रांत यश संपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे त्यांचे स्वप्न आजही अनेक संस्थांमधून साकार होत आहे. रामशेठ ठाकूर हे जनतेच्या मनातील नेते आहेत. त्यांचे नेतृत्व हे सत्तेच्या केंद्रस्थानी नसून लोकांच्या हृदयात आहे. त्यांनी कधीही पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीचा हव्यास बाळगला नाही; उलट जनतेच्या सेवेलाच त्यांनी आपले कर्तव्य मानले. सामान्य माणसाशी संवाद साधण्याची त्यांची शैली, कार्यकर्त्यांप्रती असलेले प्रेम आणि प्रत्येकाच्या अडचणीत तत्परतेने उभे राहण्याची वृत्ती यामुळे त्यांच्याविषयी समाजात प्रचंड आदर निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्यात राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व आहे. म्हणूनच ते सर्व समाजघटकांना आपलेसे वाटतात. ७५ वर्षांचा जीवनप्रवास आणि ५० वर्षांहून अधिक काळाची अखंड समाजसेवा हा कोणत्याही व्यक्तीसाठी अभिमानाचा विषय आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सव हा केवळ वाढदिवसाचा सोहळा नसून समाजसेवेच्या महान परंपरेचा उत्सव आहे. त्यांच्या कार्यातून अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आहे. समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणे, माणुसकी जपणे आणि विकासाचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांची खरी ओळख आहे. त्यामुळे आज त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समाजातील सर्व स्तरांतून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जात आहे. त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. सर्वसामान्यांचा आधारवड, समाजसेवेचा अखंड दीपस्तंभ दानशूर व्यक्तिमत्व, लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांना अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य लाभो, ही श्री.साईचरणी प्रार्थना!**

**- हरेश महादेव साठे**

---

## भिंगारी जवळ कारला लागली आग, आगीत कार जळून खाक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल जवळील भिंगारी जवळ धावत्या चार चाकी कारला रात्री अचानक आग लागल्याने या आगीत कार जळून खाक झाली. अग्निशामक दलाने ही आग विझवली.पनवेल जवळील कोस्टल गार्ड ऑफिस समोरील सर्विस रस्त्यावर एका खाजगी कारला 31 मे रोजी रात्रीच्या सुमारास भीषण आग लागली. या कारला आग लागल्याचे दिसताच पनवेल वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अग्निशामक दलाला पाचारण



केले. अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत कारला लागलेली आग विझवली. मात्र या आगीत कार जळून खाक झाली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नसली तरी देखील कारचे मोठे नुकसान झाले. कारला आग लागल्याने थोड्याफार प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. कारला आग कशामुळे लागली हे समजू शकलेले नाही.

## पुस्तक विक्रीचा बाजार की शिक्षणाचा मंदिर ? पालकांच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या शाळांना गटशिक्षणाधिकाऱ्यांचा इशारा!

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर पनवेल प्रतिनिधी:** पनवेल तालुक्यातील अनेक खासगी व अनुदानित शाळांकडून विद्यार्थ्यांच्या पालकांवर शैक्षणिक साहित्य, पुस्तके, वह्या, गणवेश तसेच इतर साहित्य शाळेतूनच खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी वाढत असताना गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पनवेल यांनी याबाबत महत्त्वाचे पत्र जारी केले आहे.

या पत्रानुसार कोणतीही शाळा पालकांना शाळेमधूनच पुस्तके किंवा शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करू शकत नाही. पालकांना त्यांच्या पसंतीच्या दुकानातून किंवा विक्रेत्याकडून आवश्यक साहित्य खरेदी करण्याचा पूर्ण अधिकार आहे. शाळा केवळ सुविधा म्हणून साहित्य उपलब्ध करून देऊ शकतात, मात्र त्यासाठी पालकांवर कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा सक्ती करता येणार नाही.

दुर्दैवाने काही शाळांनी शिक्षणाला सेवा न मानता व्यवसायाचे स्वरूप दिल्याचे चित्र दिसत आहे. प्रवेश शुल्क, विविध आकारणी आणि त्यातच पुस्तकांच्या नावाखाली होणारी अतिरिक्त आर्थिक लूट यामुळे पालक आर्थिकदृष्ट्या भरडले जात आहेत. शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य




घडविण्याऐवजी पालकांच्या खिशावर डल्ला मारण्याचे काम करू नये, अशी तीव्र भावना पालक वर्गातून व्यक्त होत आहे.गटशिक्षणाधिकाऱ्यांनी काढलेल्या या पत्रामुळे पालकांना दिलासा मिळाला असून संबंधित नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. शिक्षण विभागाने केवळ पत्र काढून न थांबता अशा शाळांची तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, अशी अपेक्षा पालक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.शिक्षण हे समाज घडविण्याचे साधन आहे, पालकांची आर्थिक पिळवणूक करण्याचे माध्यम नाही. त्यामुळे शाळांनी शिक्षण क्षेत्राची प्रतिष्ठा जपावी आणि पालकांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नये, हेच या प्रकरणातून अधोरेखित होत आहे.

# नगरसेविका मनिषा म्हात्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन; मा.आ. बाळाराम पाटील यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील :** पनवेल महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका मनिषा अनंता म्हात्रे यांच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते विधिवत संपन्न झाले. नगरसेविका मनिषा म्हात्रे यांचे पती आणि शेकापचे धाकटा खांदा गावातील खंदे कार्यकर्ते अनंता म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी अनंता म्हात्रे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, गटनेते केतन भगत, शेकापचे पनवेल विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष काशिनाथ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, तालुका चिटणीस राजेश केणी, नगरसेवक लतिफ शेख, मुकुंद म्हात्रे,भरत म्हात्रे,अनिल पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र पाटील, नगरसेविका आर्या जाधव, अर्चना भोईर,योगिता फडके, नंदकिशोर भोईर,शिवसेना (उबाठा) शहर प्रमुख प्रविण जाधव, शेकापचे शहर चिटणीस दिलीप कदम, महिला आघाडीच्या माधुरी गोसावी, अनिल ढवळे, दत्तात्रय कडू,लोकेश पाटील,भालचंद्र राजभर, उमेश डोंगरे, रोशन पाटील, नरेश म्हात्रे, संतोष पाटील आदी प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यालय उद्घाटनानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी मनिषा म्हात्रे यांचे मनापासून अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आणि पनवेलमधील नागरी समस्यांवर जाहीरपणे भूमिका मांडली. आपल्या भाषणात बाळाराम पाटील म्हणाले की, सध्या पनवेल महानगरामध्ये नागरिकांना पाण्याच्या मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत असून मालमत्ता कराचा (प्रॉपर्टी टॅक्स) प्रश्नही अद्याप प्रलंबित आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना पुरेशा मूलभूत सुविधा मिळत नसून ड्रेनेज व टॉयलेटचे पाणी रस्त्यावर येत आहे. सत्ताधाऱ्यांकडून जनतेच्या या गंभीर कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत त्यांनी स्पष्ट केले की, महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, विरोधी पक्षनेते आणि सहकारी अत्यंत धडपडीने जनतेच्या प्रश्नांसाठी प्रयत्न करत आहेत. महाविकास आघाडीच्या माध्यमातून पनवेलकरांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी आमचे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील, अशी ग्वाही त्यांनी आपल्या भाषणातून दिली.

त्यानंतर नगरसेविका मनिषा म्हात्रे यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आज धाकटा खांदा येथील जनसंपर्क कार्यालयाचे श्रीगणेशा झाले असून हे कार्यालय प्रभागातील नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहील. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या समस्या जाणून घेऊन त्या नक्कीच सोडवण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असेल आणि पनवेल शहराच्या तसेच प्रभागाच्या विकासासाठी आम्ही जीवाचे रान करू. सध्या नागरिकांना भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्येवर आणि इतर स्थानिक प्रश्नांवर विशेष लक्ष देऊन ते सोडवण्यास आमचे प्राधान्य राहील, असे सांगत त्यांनी उपस्थित सर्वांचे मनापासून आभार मानले. या नवीन कार्यालयाच्या माध्यमातून प्रभागातील नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सुटण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# अतिक्रमण हटविण्यासाठी सनय चे आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** कळवा परिसरातील कथित अतिक्रमणांवर कारवाई करण्यात प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात सनय छत्रपती शासन पक्षाने आंदोलनाचा इशारा दिला आहे. पक्षाचे मुंबई अध्यक्ष सर्जेराव निकम यांच्या नेतृत्वाखाली ३ जून २०२६ रोजी कळवा प्रभाग समिती कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी या आंदोलनात सहभागी होणार असून, संबंधित अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे. अतिक्रमण होत असताना त्याकडे दुर्लक्ष करणारे प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कळवा परिसरातील संबंधित प्रकरणात कळवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त ललिता जाधव यांनी केलेल्या प्रशासकीय नोंदींमध्ये अतिक्रमण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. मात्र, प्रक्रिया पूर्ण होऊन सुमारे चार महिने उलटून गेल्यानंतरही प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याची कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रकरणाची तक्रार महाराष्ट्र लोकायुक्तांकडे दाखल करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. प्रशासनाने तात्काळ अतिक्रमण हटवून दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.३ जून रोजी होणाऱ्या आंदोलनाकडे कळवा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले असून, प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# पनवेल राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक बैठक संपन्न; पक्ष विस्तारासाठी महत्त्वपूर्ण निर्णय

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर पनवेल प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. शशिकांत शिंदे यांच्या निर्देशानुसार पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक रविवारी सायंकाळी खांदा कॉलनी येथील संस्मरण हॉलमध्ये संपन्न झाली. या बैठकीस प्रदेश सरचिटणीस तथा पनवेल शहर जिल्हा निरीक्षक नरेश देसाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




प्रदेशाध्यक्षांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाचा विस्तार, नवीन सदस्य नोंदणी, बूथस्तरीय संघटन बांधणी तसेच आगामी राजकीय कार्यक्रमांच्या नियोजनावर बैठकीत विचारमंथन झाले.

यावेळी पक्ष संघटना वाढीसाठी नवीन कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांची निवड करण्याबाबत सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहमतीने काही नावांची शिफारस प्रदेश कार्यालयाकडे करण्यात आली. तसेच ३ जून रोजी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या मोर्चामध्ये पनवेलमधून मोठ्या संख्येने सहभागी होण्याबाबत नियोजन करण्यात आले.

या बैठकीस प्रदेश सरचिटणीस तथा जिल्हा निरीक्षक नरेश देसाई, युवक जिल्हाध्यक्ष शहाबाज पटेल, युवती जिल्हाध्यक्ष कावेरी जायभाये, व्ही. जे.एन.टी. जिल्हाध्यक्ष आनंद भंडारी, पदवीधर जिल्हाध्यक्ष स्वप्नील काटकर, प्रदेश सामाजिक न्याय विभागाचे पदाधिकारी, खांदा कॉलनी अध्यक्ष प्रदीप म्हात्रे, पनवेल शहराध्यक्ष विश्वजित मारवाह, पनवेल युवक विधानसभा अध्यक्ष सनी फडके, सरचिटणीस कामराज जांभळे, युवक प्रदेश सचिव आदित्य जानोरकर, कार्यकर्ते राकेश आनंदे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत आगामी काळात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे लढा उभारण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# उरण येथे महिला काँग्रेसतर्फे महागाई विरोधात आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती वाढवल्या आहेत. त्यामुळे महागाई गगनाला भिडली आहे. त्यामुळे सामान्य जनता भरडली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा काँग्रेस महिला अध्यक्षा रेखा घरत यांच्या अध्यक्षतेखाली उरण तालुक्यातील फुंडे पेट्रोल पंपावर रविवारी (ता. ३१) आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी मोदी सरकारविरोधात तीव्र भावना व्यक्त केल्या.

सध्याचे भाजप सरकार विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत आहे. नीट पेपर लिक झाल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरच टांगती तलवार आहे. त्यामुळे भाजप सरकारचा निषेध करावा तेव्हढा




थोडा आहे. आता तरी मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती तातडीने कमी कराव्यात आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणीही रायगड जिल्हा महिला काँग्रेसतर्फे यावेळी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष रेखा घरत, योगसाधना पाटील, अश्रया शिवकर, निर्मला पाटील, सोनाली पाटील, मनीषा पाटील, प्रमिला पाटील, पार्वती पंडित, माला पाटील, वर्षा पाटील आदी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# मोरावे येथील मुरबा गणपती मंदिराचा वर्धापनदिन भक्तिभावाने उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** मोरावे गाव येथील समुद्रात असलेल्या गणपती मंदिराचा वर्धापनदिन सोमवारी (ता. १) मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकाळच्या वेळेत गणेशपूजन आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी गव्हाण-कोपर येथील श्री गुरुकृपा भजन मंडळाच्या गायिका सुप्रिया घरत-ठाकूर यांनी गणेशावर आधारित सुमधुर भजने सादर केली. त्यांना त्यांच्या सहकारी वादकांनी उत्तम साथ दिली. मुरबा गणपती ट्रस्टींनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधले होते; परंतु ते आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जिनिव्हा येथे असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या वतीने एम. जी. ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. महेंद्रशेठ घरत हे गणेशाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांनी गणेशभक्तांचा समुद्रातील प्रवास सुखरूप व्हावा म्हणून १५ लाखांच्या दोन पॅसेंजर बोटी मुरबा गणपती देवस्थानला दान केल्या आहेत. त्यामुळे गणेशभक्त अतिशय आनंदाने पॅसेंजर बोटीतून प्रवास करून गणेशाचे दर्शन घेतात, फ्लेमिंगोंचा




आनंद घेतात. सध्या कडक उन्हाळ्यामुळे सूर्य आग ओकत असतानाही छप्पर असणाऱ्या पॅसेंजर बोटींमुळे भक्तांचा प्रवास आनंदमयी झाला. त्यामुळे गणेशभक्तांनी महेंद्रशेठ घरत यांचे आभारही मानले.

मुरबा गणपती देवस्थानचे ट्रस्टी शरद म्हात्रे, हेमंत पाटील, तेजस म्हात्रे, रितेश म्हात्रे यांनी वर्धापन दिनानिमित्त गणेशभक्तांची जय्यत तयारी केली होती. यावेळी गणेशभक्तांना महेंद्रशेठ घरत यांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'सुखकर्ता' विशेषांकाचे वितरण करण्यात आले. तसेच सर्व गणेशभक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

# समाजबंध जपणारा आमरस सोहळा : रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार दिवाकर मोहोड यांचा सन्मान"

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव :** वाडी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामकथाकार, कीर्तनकार व प्रवचनकार म्हणून ओळखले जाणारे ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक हे आपल्या प्रभावी रामकथा आणि समाजप्रबोधनपर कार्यामुळे सर्वदूर परिचित आहेत. श्रीरामांच्या आदर्श चरित्राचे रसाळ व ओजस्वी कथन करणाऱ्या महाराजांना "रामायणाचार्य" ही उपाधी त्यांच्या असामान्य रामायण प्रवचन सेवेमुळे प्राप्त झाली आहे.

रामराव महाराज आपल्या कथा, कीर्तन आणि प्रवचनांमधून भक्ती, नैतिकता, संस्कार, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक ऐक्य यांचा संदेश देतात. त्यांच्या मते, रामकथेचे श्रवण हे केवळ धार्मिक कार्य नसून जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा मार्ग आहे. श्रीरामांच्या आदर्श जीवनातून समाजाने प्रेरणा घेऊन सुसंस्कृत व मूल्याधिष्ठित जीवन जगावे, असा संदेश



ते सातत्याने देत असतात.

महाराजांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रासह राज्याबाहेरही विस्तारलेले असले, तरी आपल्या मूळ गावी वडली खुर्दशी त्यांची असलेली नाळ आजही घट्ट आहे. वर्षातून तीन-चार वेळा ते वडली खुर्द येथील "कौशल्य निवास" येथे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. विशेष म्हणजे प्रत्येक उन्हाळ्यात आयोजित करण्यात येणारी आमरस मेजवानी हा गावातील लोकांसाठी एक आगळावेगळा स्नेहमेळावा ठरतो.

या मेजवानीमागे केवळ पाहुणचार नसून समाजातील विविध स्तरांतील लोकांना एकत्र आणून सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याचा उदात्त हेतू आहे. या निमित्ताने महाराज गावकऱ्यांशी संवाद साधतात, त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस करतात तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देतात.

याशिवाय आळंदी देवाची आणि पंढरपूर येथे वारकरी संप्रदायाच्या अभ्यासवर्गांचे संचालन करून ते अध्यात्म, संस्कार आणि संत परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत.

यंदाच्या आमरस मेजवानी सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार चरणसिंग ठाकूर उपस्थित होते. तसेच श्री चिखले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. या प्रसंगी मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमांतील वृत्तपत्रांद्वारे समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणारे ज्येष्ठ पत्रकार श्री दिवाकर मोहोड यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडून सामाजिक प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकणाऱ्या श्री मोहोड यांच्या कार्याचा गौरव उपस्थितांनी कौतुकाने केला. यावेळी संजय सावरकर वइतर अनेक मान्यवर व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास गावच्या सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत संपूर्ण सदस्य गण तसेच गावातील संपूर्ण सदस्य गण उपस्थित होते. स्नेह, संस्कार, सामाजिक ऐक्य आणि परस्पर जिव्हाळा वृद्धिंगत करणारा हा आमरस सोहळा उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

समाजप्रबोधन, अध्यात्म आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम घडवून आणणारे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे हे कार्य आजच्या काळात प्रेरणादायी ठरत असून, समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते सातत्याने करीत आहेत.

# अपघातग्रस्तांच्या मदतीला धावले आमदार गजाननभाऊ लवटे उपजिल्हा रुग्णालयात स्वतः थांबून केली विचारपूस, उपचाराच्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** अंजनगाव सुर्जी ते दर्यापूर मार्गावर दौऱ्यावर असताना अपघात झालेला पाहताच आमदार मा. श्री. गजाननभाऊ लवटे यांनी तत्काळ आपला ताफा थांबवून जखमींना मदत केली. जखमींना स्वतःच्या वाहनातून उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून त्यांनी लोकप्रतिनिधीचे कर्तव्य पार पाडले.

सायंकाळी अंजनगाव सुर्जी ते दर्यापूर मार्गावर एका दुचाकीस्वाराचा अपघात झाला होता. रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरुणाला पाहून इतर वाहनधारकांनी गर्दी केली होती. त्याच वेळी मतदारसंघाच्या दौऱ्यावर



असलेले आमदार गजाननभाऊ लवटे त्या मार्गाने जात होते. अपघात पाहताच त्यांनी चालकाला गाडी थांबवण्यास सांगितले.

सुरक्षा रक्षक व कार्यकर्त्यांच्या मदतीने त्यांनी जखमीला रस्त्याच्या कडेला घेतले. 108 रुग्णवाहिका येण्यास विलंब होत असल्याने वेळ न दवडता त्यांनी जखमीला आपल्या वाहनातून थेट अंजनगाव सुर्जी येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवले.

रुग्णालयात पोहोचल्यानंतर आमदार लवटे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना तत्काळ योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या. डॉक्टरांची टीम येईपर्यंत ते स्वतः अपघात कक्षाबाहेर थांबले होते. जखमीच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना धीर दिला. उपचारासाठी लागणारी सर्व मदत करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

यावेळी माध्यमांशी बोलताना आमदार लवटे म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणे हे माझे कर्तव्यच आहे. अपघातग्रस्ताला पाहून न थांबणे हा माणुसकीला कलंक ठरला असता. पद महत्वाचे नाही, प्रसंगी माणूस म्हणून उभे राहणे महत्वाचे आहे."


आमदारांच्या या तत्परतेमुळे एकाचा जीव वाचल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. "संकटाच्या काळात धावून जाणे हाच खरा लोकप्रतिनिधीचा धर्म असतो, तो भाऊंनी दाखवून दिला," अशा प्रतिक्रिया घटनास्थळी उपस्थितांनी दिल्या. दरम्यान, जखमी तरुणावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

# ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ . एस . सुब्रमण्यम यांचे नवी मुंबईत निधन

**दैनिक युवक आधार**

**संपादक सतीश कडू नागपूर विभाग :** वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (WCL) चे माजी वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.सुब्रमण्यम यांचे मंगळवारी 27 मे रोजी, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक व मित्र परिवारातील हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

डॉ. सुब्रमण्यम हे नागपूर येथील गोमती अपार्टमेंट, लॉ कॉलेज चौक येथील रहिवासी होते. आपल्या सेवाकाळात त्यांनी रुग्णसेवा व सामाजिक बांधिलकी जपत अनेकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण



केले होते.

शनिवारी 30 मे 2026 रोजी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी, माजी सहकारी तसेच अनेक शुभचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार आणि आप्तपरिवार आहे.

# शायना एन. सी. शिवसेनेच्या प्रभारी राष्ट्रीय सचिवपदी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** शिवसेनेतर्फे सौ. शायना एन. सी. यांची पक्षाच्या प्रभारी राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांच्या आदेशाने करण्यात आली असून, 1 मे 2026 पासून एका वर्षासाठी लागू राहील. बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण जनतेपर्यंत पोहोचवणे ही त्यांची मुख्य जबाबदारी असेल.

# मध्य रेल्वेतर्फे विविध जनजागृती उपक्रमांसह जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**संपादक सतीश कडू नागपूर विभाग :** जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी ३१ मे रोजी साजरा केला जातो.जागतिक तंबाखू विरोधी दिनाचा एक भाग म्हणून, मध्य रेल्वेने तंबाखू सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध स्थानकांवर जनजागृती उपक्रम राबवले.या उपक्रमाचा एक भाग म्हणून, प्रवाशांना तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळण्याचे आवाहन करणारे संदेश स्थानक परिसरात लावलेल्या फलकांवर ठळकपणे प्रदर्शित करण्यात आले.प्रवाशांना तंबाखू सेवनाची सवय सोडण्यासाठी समुपदेशन करण्यात आले आणि त्यापैकी अनेकांनी प्रतिकात्मक कृती म्हणून, या उद्देशासाठी ठेवलेल्या कचराकुंड्यांमध्ये आपल्याकडील तंबाखूची पाकिटे टाकली.

स्थानक व्यवस्थापक आणि त्यांच्या समर्पित कर्मचाऱ्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली ३० आणि ३१ मे २०२६ रोजी रे रोड स्थानकावर एक स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती, जिथे प्रवाशांना तंबाखू न वापरण्याची शपथ घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमाला प्रवाशांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला, ज्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला आणि या कार्याला पाठिंबा दिला.स्वच्छ आणि आरोग्यदायी प्रवासाचे वातावरण सुनिश्चित करण्याच्या भारतीय रेल्वेच्या प्रयत्नांनुसार, मध्य रेल्वे प्रवाशांचे आरोग्य आणि कल्याण जपण्यासाठी कटिबद्ध आहे

# जिल्हा परिषद नागपूरच्या "प्रोजेक्ट DREAM" वर भारतीय टपाल विभागातर्फे विशेष वाहतूक कव्हरचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**संपादक सतीश कडू नागपूर विभाग :**भारतीय टपाल विभाग आणि जिल्हा परिषद नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद नागपूरच्या "प्रोजेक्ट DREAM – Dedicated Reading Rooms for Empowerment, Awareness & Motivation" या उपक्रमावर आधारित विशेष वाहतूक कव्हर प्रकाशित करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये वाचन, अध्ययन, जागरूकता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात शंकर नगर टपाल कार्यालय, नागपूर येथे झाली. यावेळी श्री अतुल काळे, सहाय्यक संचालक डाक सेवा (ADPS-III), नागपूर विभाग यांनी विशेष कव्हर्स कु. प्राची वाघमारे, महिला पोस्टमन यांच्याकडे समारंभपूर्वक सुपूर्द केले. यासोबतच या विशेष वाहतुकीचा शुभारंभ करण्यात आला.




यानंतर ही विशेष कव्हर्स जिल्हा परिषद नागपूरच्या खास तयार करण्यात आलेल्या "ज्ञानरथ" मधून वाहून नेण्यात आली. ज्ञानाचा प्रसार आणि शैक्षणिक जागरूकतेचा संदेश देणारा हा ज्ञानरथ शंकर नगर टपाल कार्यालय येथून जिल्हा परिषद नागपूर कार्यालयापर्यंत गेला. तेथे ही कव्हर्स श्री विनायक महामुनी, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे औपचारिकरित्या सुपूर्द करण्यात आली.

या विशेष वाहतूक कव्हरचे औपचारिक प्रकाशन श्री विनायक महामुनी, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री निखिल भुयार, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक); श्री निलेश गुंड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक); डॉ. कमलकिशोर फुटाणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी; श्री कपिल काळोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर; श्री कैलास घोडे; वेदांत पाठक, मुख्यमंत्री फेलो, नागपूर; श्री सुजितकुमार लांडगे, वरिष्ठ पोस्टमास्तर, नागपूर जीपीओ, तसेच जिल्हा परिषद नागपूर आणि भारतीय टपाल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हा कार्यक्रम नागपूरसाठी विशेष महत्त्वाचा ठरला आहे. जिल्हा परिषद आणि भारतीय टपाल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कव्हर प्रकाशित करून ते ज्ञानावर आधारित विशेष वाहनातून वाहून नेण्याचा हा नागपूरमधील पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेला उपक्रम आहे. तसेच अशा प्रकारच्या उपक्रमांमध्ये हा देशातील मोजक्या आणि अभिनव सहकार्यांपैकी एक मानला जात आहे.

ज्ञानरथातून वाहून नेण्यात आलेले हे विशेष वाहतूक कव्हर फिलाटेलिस्ट, टपालप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये विशेष आकर्षण ठरणार असून यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे.या कार्यक्रमाला फिलाटेलिस्ट, टपालप्रेमी, अधिकारीवर्ग आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. त्यामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

# पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी रोटरी ESG-CSR पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी :-सचिन पवार :** पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीला सामाजिक उत्तरदायित्व (CSR) क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी प्रतिष्ठेचा "रोटरी सीएसआर पुरस्कार २०२६" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. स्थानिक समुदायाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि उपजीविका विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. रोटरी इंटरनॅशनल डीस्ट्रीक्ट ३१३१ (रायगड आणि पुणे जिल्हा) ने आयोजित केलेला रोटरी ESG-CSR पुरस्कार २०२६ समारंभ २९ मे २०२६ रोजी पुणे येथील मॅरिगोल्ड बँक्वेट्स येथे आयोजित करण्यात आला होता.पोस्को महाराष्ट्रने आपल्या CSR उपक्रमांतर्गत महिला बचत गट, शेतकरी आणि स्थानिक नागरिकांच्या




सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम राबविले आहेत. महिला बचत गटातील सदस्यांसाठी अभ्यास दौरे, मार्गदर्शन शिबिरे, उद्योजकता विकास प्रशिक्षण आणि उत्पन्नवाढीच्या संधी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन शिबिरे, प्रगत शेती प्रकल्पांचे अभ्यास दौरे, फळझाडांचे वाटप, शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना आणि कृषी क्षेत्रातील क्षमता विकासासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

स्थानिक समुदायाच्या शाश्वत विकासासाठी पोस्को महाराष्ट्रने केलेल्या या योगदानाची दखल घेत रोटरीतर्फे हा सन्मान प्रदान करण्यात आला.पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात पोस्को महाराष्ट्रच्या प्रतिनिधींनी हा पुरस्कार स्वीकारला. पोस्को महाराष्ट्र भविष्यातही शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण आणि उपजीविका विकास या क्षेत्रांत प्रभावी CSR उपक्रम राबवून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत राहणार असल्याचे कंपनीने यावेळी नमूद केले. हा पुरस्कार केवळ आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीचीच कबुली देत नाही तर एक चांगली सामाजिक चळवळ निर्माण करण्याच्या दिशेने आमचा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो, अशी भावना यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

# अखिल भारतीय संयुक्त अधिवक्ता मंच भारतचा स्थापना दिन उत्साहात साजरा"

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव :** अखिल भारतीय संयुक्त अधिवक्ता मंच भारतचा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. छत्रपती शर्मा होते, तर सेवानिवृत्त न्यायाधीश दुर्जेंद्र शर्मा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी हायकोर्ट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अतुल पांडे, जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जायसवाल तसेच माजी अध्यक्ष ॲड. कमल सतूजा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

याप्रसंगी बोलताना ॲड. प्रकाश जायसवाल यांनी मंचाच्या वतीने करण्यात




येत असलेल्या अधिवक्ता संरक्षण कायद्याच्या मागणीला पाठिंबा दर्शवित, हा कायदा महाराष्ट्रात लवकरात लवकर लागू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व त्यासाठी मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्याकडे निवेदन सादर केले जाईल, असे सांगितले.

ॲड. अतुल पांडे आणि ॲड. कमल सतूजा यांनीही अधिवक्ता संरक्षण कायदा लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रत्येक लढाई लढण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले.

सेवानिवृत्त न्यायाधीश विजेंद्र शर्मा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देशातील न्यायव्यवस्थेमध्ये अगदी लहान-लहान प्रकरणांमध्येही न्याय मिळण्यासाठी नागरिकांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागते, ही चिंतेची बाब आहे.

अध्यक्षीय भाषणात ॲड. छत्रपती शर्मा यांनी मंचाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे स्पष्ट करताना देशभरात अधिवक्ता संरक्षण कायदा लागू करून घेण्यासाठी मंच कटिबद्ध असल्याची पुनरुच्चार केला.

या कार्यक्रमाला ॲड. भरत वोरा, किशोर लांजेवार, गौतमी नारनवरे, प्रभात मिश्रा, मृणाल मोरे, छाया देवी यादव, मंजुषा गिरडकर, अपर्णा झा, विशाखा मेश्राम, सुंदरी चक्रनारायण, प्रीती पिंपळकर, मोरेश्वर उपासे आदी अधिवक्ते उपस्थित होते.

# रस्त्यालगतच्या मोठ्या भगदाडामुळे दुचाकीचा भीषण अपघात; श्रीवर्धन–हरिहरेश्वर मार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** गालसुरे गावाजवळील मुख्य रस्त्यालगत असलेल्या नाल्याला पडलेल्या मोठ्या आणि उघड्या भगदाडामुळे एका दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली असून या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेकडे आणि प्रवाशांच्या सुरक्षेकडे संबंधित प्रशासन किती दुर्लक्ष करत आहे, याचे हे आणखी एक गंभीर उदाहरण असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एक दुचाकीस्वार या मार्गावरून प्रवास करत असताना रस्त्यालगतच्या नाल्याला पडलेल्या धोकादायक भगदाडात दुचाकी आदळली. अपघाताची तीव्रता इतकी मोठी



होती की दुचाकीच्या समोरील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला. हेडलाईट, इंडिकेटर्स, हँडलसह अनेक भाग पूर्णपणे तुटून नुकसानग्रस्त झाले असून वाहनचालक गंभीर जखमी झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, या अपघाताला संबंधित विभागाचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे. रस्त्याच्या अगदी कडेला एवढे मोठे भगदाड पडूनही ते दुरुस्त करण्यात आले नाही, तसेच तेथे कोणतेही इशारा फलक, बॅरिकेड्स किंवा सुरक्षाव्यवस्था उभारण्यात आलेली नाही. रात्रीच्या वेळी या परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने वाहनचालकांना हा धोका अधिक वाढतो. परिणामी, थोडेसे दुर्लक्ष किंवा समोरून येणाऱ्या वाहनांचा प्रकाश यामुळे चालक थेट या भगदाडात कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, हा मार्ग श्रीवर्धन–हरिहरेश्वर या पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गांपैकी एक आहे. वर्षभर या रस्त्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. विशेषतः शनिवार-रविवार तसेच सुट्ट्यांच्या काळात शेकडो दुचाकी आणि चारचाकी वाहने या मार्गावरून प्रवास करतात. त्यामुळे सध्याच्या स्थितीत हे भगदाड केवळ स्थानिकांसाठीच नव्हे तर बाहेरून येणाऱ्या पर्यटकांसाठीही मोठा जीवघेणा सापळा ठरत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

"प्रशासनाला जाग येण्यासाठी आणखी किती अपघात आणि किती बळी लागणार आहेत?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. अनेक दिवसांपासून हा धोका कायम असतानाही संबंधित विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.दरम्यान, या घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ उपाययोजना करण्यात यावी, तसेच नाल्यावरील हे भगदाड युद्धपातळीवर बुजवून त्या ठिकाणी मजबूत संरक्षक भिंत, रेलिंग किंवा बॅरिकेड्स उभारण्यात यावेत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा भविष्यात यापेक्षाही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीती व्यक्त होत आहे.

# ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराविरोधात नागरिक आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर आज नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत थेट पंचायत समिती गाठली. ग्रामसेवक उपस्थित राहणार नसल्याची शक्यता आधीपासूनच असल्याचे नागरिकांनी सांगितले. "भ्रष्टाचार करणारे लोक नेहमी सत्यापासून दूर पळ काढतात," अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.




यानंतर नागरिकांच्या शिष्टमंडळाने पंचायत समितीचे BDO डी. के. आडेराघो यांची भेट घेत गावात झालेल्या विविध कामांमधील कथित भ्रष्टाचाराबाबत सविस्तर चर्चा केली. संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच, योग्य कारवाई झाली नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडून न्याय मिळवला जाईल, असा इशाराही नागरिकांनी दिला. यावेळी BDO यांनी सकारात्मक चर्चा करत ग्रामपंचायतीतील कोणत्याही गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी प्रशासन सहकार्य करेल, असे आश्वासन दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

नागरिकांनी यावेळी भ्रष्टाचाराविरोधात एकजूट दाखवत प्रशासनाने पारदर्शक कारभार करावा, अशी मागणी केली.

> "सत्य लपवून राहत नाही,

> जनतेचा आवाज कधी दाबला जात नाही.

> अन्यायाविरुद्ध लढणारेच,

> खऱ्या अर्थाने गावाचे भविष्य घडवत असतात."

# पनवेल वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे प्रवाशास वेळेत मिळाले जीवदान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ३१ मे रोजी मुंबई (परेल) येथून तुळजापूरकडे जाणारी एस.टी. बस क्रमांक एम एच 13 सीयू 6335 ही शिवशंभो नाका, पनवेल सिग्नलवर थांबली असता बसमधील अंदाजे ४५ वर्षीय पुरुष प्रवाशास अचानक फिट आली. त्यानंतर चक्कर येऊन तो बसमध्येच कोसळला व त्याच्या तोंडातून रक्तस्राव सुरू झाला. ही बाब एस.टी. कंडक्टरच्या निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ सिग्नलवर कर्तव्य बजावत असलेले पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जौजाळ यांना माहिती दिली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत संबंधित प्रवाशास बसमधून सुरक्षित बाहेर



काढून ऑटो रिक्षाद्वारे मार्केट यार्ड, पनवेल येथील आधार हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्याने प्रवाशाचा जीव वाचला.

आधार हॉस्पिटलमधील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी संबंधित व्यक्तीस तातडीने उपचार सुरू केले. उपचारानंतर संबंधित व्यक्ती शुद्धीवर आली असून तिच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. तसेच संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली असून पुढील कार्यवाहीसाठी पनवेल पोलीस स्टेशनला कळविण्यात आले आहे. पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार, एस.टी. कंडक्टर, रिक्षाचालक तसेच आधार हॉस्पिटलमधील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे संबंधित प्रवाशास वेळेत वैद्यकीय मदत मिळाली. त्यांच्या संवेदनशील व मानवतावादी कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# वडद ग्रामपंचायतीच्या पाठपुराव्याला यश: अखेर गावात पोहोचला पाण्याचा टँकर

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी :** गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या वडद गावासाठी अखेर दिलासादायक बातमी समोर आली आहे. वडद ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर, प्रशासनाने गावात पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला आहे.

**पाणीटंचाईमुळे ग्रामस्थ त्रस्त**

वडद ग्रामपंचायतीचे सरपंच दुर्गेश पटले यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन महिन्यांपासून गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली होती. ओवारा डॅम (Owara Dam) प्रकल्पातून पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने गावकरी हवालदिल झाले होते.



यासाठी ग्रामपंचायतीने वेळोवेळी ओवारा प्रकल्प कार्यालय, स्थानिक आमदार आणि संबंधित सरकारी विभागांकडे लेखी तक्रारी केल्या होत्या, मात्र ठोस कार्यवाही झाली नव्हती.

**लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या सहकार्याने प्रश्न मार्गी**

अखेर, माजी उपसभापती मनोहरलालजी चौधरी, प्रतिष्ठित नागरिक सुभाषजी अवलकर, ग्रामस्थ आणि सरपंच दुर्गेश पटले यांच्या संयुक्त प्रयत्नांतर्गत हा प्रश्न जिल्हाधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी (BDO) आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेशभाऊ हर्से यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आला. गावाची भीषण परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने तत्काळ दखल घेतली आणि पाहणी करून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी दिली.

**ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण**

३० मे २०२६ रोजी गावात पाण्याची टँकर पोहोचल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत ही सोय उपलब्ध राहिल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या संकटाच्या काळात सहकार्य करणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींचे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे सरपंच दुर्गेश पटले यांनी आभार मानले आहेत.

## रोटरी क्लब ऑफ नागपूर होरायझन्सच्या सदस्यांचे असोसिएशन ऑफ मेडिकल फॅकल्टीला संबोधन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** रोटरी क्लब ऑफ नागपूर होरायझन्सचे दोन प्रतिष्ठित सदस्य, डॉ. शंकर खोब्रागडे आणि माजी अध्यक्ष डॉ. राजेश बल्लाळ, यांना असोसिएशन ऑफ मेडिकल फॅकल्टीने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.




डॉ. शंकर खोब्रागडे यांनी "अचानक हृदयविकाराने होणारा मृत्यू आणि हृदयविकाराच्या झटक्याविषयी जागरूकता" या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी अधोरेखित केले की, भारतात मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक म्हणजे अचानक हृदयविकाराने होणारा मृत्यू आहे आणि हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे लवकर ओळखणे व त्वरित वैद्यकीय उपचार घेणे याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या आजारांचा वाढता भार निर्माण होण्यामागे बैठी जीवनशैली, अस्वास्थ्यकर आहार सवयी, तणाव आणि चुकीच्या व्यायाम पद्धती यांची भूमिका यावरही त्यांनी चर्चा केली. डॉ. खोब्रागडे यांनी उपस्थितांना सक्रिय सहभाग आणि अर्थपूर्ण संवादासाठी प्रोत्साहित करत सत्राचे प्रभावीपणे संचालनही केले.ज्येष्ठ फुफ्फुसरोगतज्ञ आणि वैद्यकीय विमा सल्लागार, डॉ. राजेश बल्लाळ यांनी "वैद्यकीय विमा नियोजन आणि दावा व्यवस्थापन" या विषयावर आपले विचार मांडले. आरोग्य विमा पॉलिसी निवडताना विचारात घ्यावयाच्या प्रमुख घटकांचे त्यांनी स्पष्टीकरण दिले आणि विमा दाव्याची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली खबरदारी, कागदपत्रे व तयारी यांची रूपरेषा मांडली. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत गुंतागुंत टाळण्यासाठी विमा-संबंधित निर्णय घेताना तज्ञांचे मार्गदर्शन घेण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.हा कार्यक्रम अत्यंत माहितीपूर्ण होता आणि वैद्यकीय क्षेत्रातील सदस्यांनी त्याचे खूप कौतुक केले. यातून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी जागरूकता आणि वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीसाठी आर्थिक तयारी यांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळाली.असोसिएशन ऑफ मेडिकल फॅकल्टीने दोन्ही वक्त्यांना त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल अभिनंदन केले आणि आरोग्य व विमा-संबंधित महत्त्वाच्या विषयांवर जागरूकता निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## श्रीवर्धन दांडा स्मशानभूमीत शेड व प्रकाशव्यवस्थेचा अभाव; पावसाळ्यापूर्वी तातडीने सुविधा उपलब्ध करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना श्रीवर्धन दांडा येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या स्मशानभूमीतील मूलभूत सुविधांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अंत्यसंस्कारासाठी वापरण्यात येणाऱ्या या स्मशानभूमीत अद्यापही पत्र्याचे शेड आणि पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाळ्यात अंत्यविधी पार पाडताना मोठ्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक कोळी बांधवांनी श्रीवर्धन नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.



समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या या स्मशानभूमीत पावसाळ्याच्या काळात जोरदार वारे, मुसळधार पाऊस आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधांचा अभाव गंभीर अडचणी निर्माण करू शकतो. विशेषतः चितास्थळांवर शेड नसल्यामुळे पावसाचे पाणी थेट चितेवर पडण्याचा धोका असून त्यामुळे अंत्यविधीमध्ये व्यत्यय येऊ शकतो, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन श्रीवर्धन दांडा भंडारी समाज, मधला कोळीवाडा, टक्का कोळीवाडा कोळी समाज तसेच खारवीवाडा खारवी समाज या विविध समाज संघटनांनी एकत्र येत संयुक्त निवेदन सादर केले आहे. संबंधित समाजांच्या अध्यक्ष व प्रतिनिधींनी स्वाक्षरी केलेले हे निवेदन श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडे देण्यात आले असून स्मशानभूमीतील समस्या तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनामध्ये नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्मशानभूमीची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घ्यावा, परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था उभारावी आणि अंत्यसंस्कारासाठी असलेल्या तिन्ही जळीत व्यवस्थांवर मजबूत पत्र्याचे शेड उभारण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या विषयाची गंभीरता लक्षात घेऊन निवेदनाच्या प्रती रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिलजी तटकरे साहेब आणि श्रीवर्धन मतदारसंघाच्या आमदार आदिती ताई तटकरे मॅडम यांनाही माहितीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, स्मशानभूमी ही अत्यंत संवेदनशील आणि आवश्यक सार्वजनिक सुविधा असून तिच्याकडे दुर्लक्ष होणे योग्य नाही. विशेषतः पावसाळ्यापूर्वी आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.आता पावसाळा सुरू होण्यास फारसा अवधी शिल्लक नसताना श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासन या मागण्यांची कितपत दखल घेते आणि स्मशानभूमीत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देते का, याकडे संपूर्ण श्रीवर्धन दांडा विभागाचे लक्ष लागले आहे.

## ग्रामपंचायत विचुंबे हद्दीत विविध शासकीय निधीतून करोडोंची विकास कामे मार्गी- प्रमोद भिंगारकर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ग्रामपंचायत विचुंबे हद्दीत विविध शासकीय निधीतून करोडो रुपयांची विकासकामे मार्गी लागली असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी दिली. येत्या काही काळात आणखी विकासकामे विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**नवीन पुलाचे काम सुरू असताना देखील विरोधकांनी विरोध सुरू ठेवला होता. मात्र नवीन ब्रिज पूर्ण होऊन सुरू देखील झाला. विचुंबे सार्वजनिक ग्रामपंचायत इलेक्शन 2023 मध्ये झालेल्या पराभवामुळे पुरुषोत्तम भोईर बिनबुडाचे आरोप करत आहे. ग्रामपंचायत विचुंबे तसेच लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर यांची बदनामी करणे व ग्रामपंचायतीच्या विकासकामांचा झंझावात बघून पुरुषोत्तम भोईरच्या पोटामध्ये उठलेल्या पोटशुलामुळे ग्रामपंचायतचा व प्रमोद भिंगारकर यांचा नाव बदनाम करणे अशा एक ना अनेक बातम्या पुरुषोत्तम भोईर लोकांना पाठवत आहे. तरीपण सर्व सुज्ञ जनतेने अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. आजपर्यंत विचुंबे हद्दीत न झालेली आणि रखडलेली अनेक कामे मार्गी लागली. रस्ते, गटारे, काँक्रिटीकरण ई. कामे पूर्ण झाली. विरोधकांना याचा पोटशुळ उठला आहे. चांगली कामे विचुंबे हद्दीत झालेली यांना पाहवत नाहीत, त्यामुळे ते विरोध करत आहेत.**

**- प्रमोद भिंगारकर, लोकनियुक्त सरपंच, विचुंबे**

डिसेंबर 2023 ते ऑगस्ट 2025 पर्यंत 67 लाख 21 हजार 701 रुपयांची विकासकामे करण्यात आली. यात गटार बांधणे, रस्ते दुरुस्ती, डांबर खडीने रस्ते दुरुस्ती, सीसीटीव्ही कॅमेरे, रस्ते कॉंक्रिटीकरण, गटार सफाई, आरसीसी पाईप गटार बांधणे, शाळा दुरुस्ती करणे यासारख्या महत्त्वाची कामांचा समावेश आहे. 2025 ते 2026 दरम्यान 97 लाख 7 हजार 218 रुपयांची विकासकामे करण्यात आली. यात विचुंबे गाढि नदीला संरक्षण भिंत बांधणे, स्मशानभूमी दुरुस्ती आणि रंगरंगोटी, पाडा पाणवठा देवी येथे पायऱ्या बांधणे, रस्ते कॉंक्रिटीकरण, चेंबर दुरुस्ती, स्मशानभूमी येथे स्वच्छतागृह बांधणे, स्ट्रीट लाईट बसवणे, शाळेची कंपाउंड वॉल दुरुस्ती, टेरेस दुरुस्ती, शाळेत शौचालय बांधणे आणि फरशी बसवणे, आरसीसी पाईप गटर बांधणे, पेवर ब्लॉक, उद्यान सुशोभीकरण, गार्डन सुशोभीकरण, स्मशानभूमी परिसर सुशोभीकरण या कामांचा समावेश आहे.

जिल्हा नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार निधी, सामाजिक विकास योजना, एमएमआरडीए अंतर्गत 11 कोटी 99 लाख 68 हजार 714 रुपयांची कामे करण्यात आली. यात विचुंबे येथील आठ कोटी रुपयांच्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आले. सध्या हा पूल वाहतुकीसाठी उपयुक्त ठरत आहे. पंधराव्या वित्त आयोगातून सीसीटीव्ही कॅमेरे, चेंबर सफाई आणि बांधकाम, पाणीपुरवठा लाईन, शौचालय, ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी, हायमास्ट बसवणे अशी 48 लाख 38 हजार 60 रुपयांची कामे करण्यात आली. नुकताच विचुंबे ग्रामपंचायतला पहिल्यांदा 2025 मध्ये स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार देखील मिळाला. विचुंबे येथील पोलीस चौकी ते ओमकार पार्क एक, दोन, तीन कडे जाणारा रस्ता बऱ्याच वर्षानंतर पूर्ण झाला. मंगलमूर्ती सोसायटीकडे जाणारा रस्ता रखडला होता तो देखील मार्गी लागला. तसेच ज्ञानेश्वर माऊलीकडे जाणारा रस्ता अडीच कोटी खर्च करून बनवण्यात आला. विचुंबे हद्दीत गार्डन देखील बनवण्यात आले. विचुंबेमध्ये स्ट्रीट लाईटसाठी सोलर पॅनल कार्यान्वित आहेत. ग्रामपंचायत हद्दीत 100 पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे सुरू आहेत. ही सर्व कामे माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत, भारतीय जनता पार्टी विचुंबे आणि ग्रामपंचायतच्या प्रयत्नातून झाली आहेत.

## पेण येथे रंगला सामाजिक आणि राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** पेण येथे दोन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. 'आभासात मी' या प्रा. एल. बी. पाटील लिखित पुस्तकासह 'रामदास : अखेरचा प्रवास' या गुंजार पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन समारंभ दि. ३१ मे २०२६ रोजी आसरा फार्म, मु. वरवणे धनगरवाडी, पेण येथे संपन्न झाला .गुंजार पाटील यांचे १५ वे आणि एल. बी. पाटील यांचे ३५ वे अशा दोघांच्या ५० व्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ही वाचक साहित्यप्रेमींना जणू पर्वणीच .



या सोहळयाला विविध क्षेत्रातील मान्यवरांचीआणि प्रेक्षकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. प्रशांत देशमुख यांनी भूषविले . कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संजय गुंजाळ-अध्यक्ष कोमसाप रायगड,कोकण गोवा महामार्गाचे गाढे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण पाटील, रायगड कोमसाप कार्याध्यक्ष पुरुषोत्तम मुळे- कोमसाप रायगड सचिव संजय होळकर , अंड गोपाळराव शेळके, महिलाध्यक्ष रायगड संध्या दीवकर,युवाध्यक्ष सिध्देश लखमदे ,गझलकारा ज्योत्स्ना राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे उद्घाटन संजय गुंजाळ यांच्या हस्ते झाले.तीन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ कवी ए.डी.पाटील,चैतन्य उषा लक्ष्मण,आणि डॉ.राजेंद्र राठोड या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी रामदास बोट अपघातग्रस्त सुपुत्र श्रीरंग घरत.ज्येष्ठ साहित्यिक रोहिदास पोटे,डॉ. राजेंद्र राठोड- साहित्यिक दीपाली दिवेकर-अस्सी. कमिशनर, नवी मुंबई यांची भाषणे झाली रायगडमधील गुणी जनांना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये जीविता पाटील-ज्येष्ठ साहित्यिका, ज्येष्ठ कवी प्रवीण बोपुलकर, कवी डॉ.अमृत पाटील,कादंबरीकार गंज आनन म्हात्रे, कथाकार अजय शिवकर, साहित्य संपदाचे वैभव धनावडे , कवी गायक अनील भोईर,लवेंद्र मोकल इत्यादीचा सन्मानाने गौरव करण्यात आला. लेखक आगरी साहित्य रत्न प्रा.एल.बी. सर,लेखक गुंजारव पाटील यांचे शिव व्याख्याते प्रशांत देशमुख यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आले. अतिशय विनोदी ढंगात गंधार पाटील पाटील यांनी प्रास्ताविक आणि आभार मानले.कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सुप्रसिद्ध संचालिका दर्शना माळी आणि हेमंत बारटक्के यांनी करून दर्जेदार केला..

## उपव्यवस्थापकाचा मनमानी कारभार अड्याळ येथील सेंट्रल बँक येथील प्रकरण ; अनेक सुविधांचा अभाव

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -पवनी तालुक्यातील अड्याळ येथील सेंट्रल बँकेचे उपव्यवस्थापक यांच्या मनमानी कारभाराला ग्राहक त्रस्त आलेले आहेत .याबाबत सविस्तर वृत्त असे की ,अड्याळ मध्ये एकमेव असलेली राष्ट्रीयकृत बँक असलेली सेंट्रल बँक मध्ये असुविधा असून वृद्धा पासून तर सुजाण नागरिकांपर्यंत त्रास असल्याचे दिसून येत आहेत. मुख्यता बँकेचे उपव्यवस्थापकव हे सुजाण लोकांना त्रास देत असल्याचे सांगितले जात आहे. एखादा फिक्स डिपॉझिट एफडी बनविण्यासाठी सहा ते आठ दिवस लागत आहे असून त्या ग्राहकांना बँकेच्या फिरा माराव्या लागत असल्यामुळे विनाकारण त्रास सहन करावा लागतो.अड्याळ मध्ये मोठी बाजारपेठ, मोठी व्यापारी बँक असलेली सेंट्रल बँक शाखा चे उपव्यवस्थापक बेडेकर काम करीत नसल्यामुळे व ग्राहकांना विनाकारण भुदंड पडत असल्यामुळे आलेल्या या बँक मध्ये योग्य सोयी




सुविधांचे फलक बँकेमध्ये लागले आहेत. परंतु ते फलकावर नाममात्र दिसून येत आहेत . या बँकेत वयोवृत्त महिला, पुरुष ,सकाळी 10 वाजेपासून उन्हामध्ये उभे रांगेत रोडवर उभे राहतात. त्यांना ना पिण्याच्या पाण्याची सोय, त् संडास, बाथरूम ची सोय नसल्यामुळे भर उन्हात उन त्यांना रांगेत उभे राहावे लागते .ही बँक राष्ट्रीयकृतअसून यात गाड्यांना पार्किंग सुविधा नाही . या सेंट्रल बँक विषयी ग्रामपंचायत मध्ये अनेक ठराव झालेली असून याकडे बरीच अधिकारी कानाडोळा करीत आहेत.

## समाजसेवेची परंपरा जपत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कर्करुग्णांसाठी १ कोटींची मदत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेले लोकनेते तथा माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी पुन्हा एकदा आपल्या समाजाभिमुख भूमिकेची प्रचिती दिली आहे. खारघर येथील इस्कॉन मंदिरात कर्करोगग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सुरू करण्यात आलेल्या 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट' आणि 'कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक' या उपक्रमांसाठी त्यांनी तब्बल ०१ कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीत शिक्षण, आरोग्य, क्रीडा, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रमांना सातत्याने पाठबळ दिले आहे. समाजातील दुर्बल, गरजू आणि संकटग्रस्त घटकांच्या मदतीसाठी ते नेहमीच पुढाकार घेत असल्याने त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आले आहे. खारघरमधील या उपक्रमाच्या माध्यमातून कर्करोगग्रस्त रुग्णांना वैद्यकीय उपचारांसोबत मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक आधार मिळावा, हा उद्देश आहे. योग, ध्यान, संगीत उपचार, सकारात्मक जीवनशैली आणि आध्यात्मिक मार्गदर्शन यांच्या साहाय्याने रुग्णांना नवचैतन्य देण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून करण्यात येणार आहे.या सेवाभावी कार्यासाठी रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केलेली १ कोटी




रुपयांची मदत ही केवळ आर्थिक योगदान नसून समाजाप्रती असलेल्या त्यांच्या संवेदनशीलतेचे आणि बांधिलकीचे प्रतीक असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या या योगदानामुळे उपक्रमाला अधिक बळ मिळणार असून अनेक कर्करुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळणार आहे. या कार्यक्रमाला कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, इस्कॉन नवी मुंबईचे मंदिर अध्यक्ष डॉ. सूर दास, भक्तिवेदांत कॉलेजचे संचालक डॉ. व्ही.सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी आदी उपस्थित होते.

होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट अंतर्गत आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबत योग, ध्यान, संगीत उपचार, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि सकारात्मक जीवनशैली यांचा समन्वय साधून रुग्णांना सर्वांगीण आधार देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे, तर कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक उपक्रमाद्वारे भक्तिमय संगीताच्या माध्यमातून मानसिक स्वास्थ्य आणि अंतर्मनातील शांतता वृद्धिंगत करण्यावर भर दिला जाणार आहे.

## भोई कहार समाजातर्फे विद्यार्थी सत्कार समारंभ

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** दरवर्षी भोई सामुदायिक पंच कमिटीच्या वतीने विविध परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला जातो. यावर्षीही समितीचे अध्यक्ष नंदकिशोर गौर यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव राहुल गौर यांच्या सर्वसमावेशक नियोजनाने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. प्रमुख पाहुणे व नगरसेविका प्रमिला गौर यांच्यासह राजेश नायक, माजी अध्यक्ष किशोर करतार, रामलाल नायक, राजेश गौर, मोतीलाल गौर, श्यामलाल गौर, अनिल गौर, मनीष बाथो यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम




संपन्न झाला. यावर्षी इयत्ता 9वी ते 12वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सन्मानित झालेल्यांमध्ये 10वी इयत्तेतील (एसएससी बोर्ड) विद्यार्थी होते:

प्रांजल हेमंत गौर (92.80%), दिशा अरविंद गौर (86.20%), कुशल दुष्यंत गौर (84.80%), हर्षित दुर्गेश गौर (84%), संस्कृती अजय गौर (71.60%), प्रियांशू अजय गौर (71.20%), हरणू सनका (71.20%), हर्षित नाका (71.20%) (८४.४०%), आणि आकांक्षी मंगलनाथ गौर (८९.८०%—खाजगी शिकवणीशिवाय मिळवले).

सारिका, सचिन मनोज गौर (78.60%), याचिका सतीश नायक (70%), आकांक्षा दिनेश गौर (72.40%), वीणा राकेश ठाकूर (66.40%), नेन्शी मुकेश नायक (82.20%), माही छोटेलाल नायक (7%), रुतलाल नायक (7%), रूग्ण नायक (7%) यांचा सत्कार करण्यात आला. संकेत गंगोत्री (CBSE: 90.8%), अनय राजेश गौर (CBSE: 75%), आणि प्रकृति विकास गौर (CBSE: 83.8%), इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार केला गेला.

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी

वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर

प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये

डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# पश्चिम महाराष्ट्र समृद्ध, मराठवाडा उपेक्षित जबाबदार कोण?

महाराष्ट्राच्या विकासाचा प्राथमिक निरीक्षण केले तर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्यातील तफावत आजही ठळकपणे दिसून येते. एका बाजूला कृष्णा खोऱ्यातील धरणे, कालवे, सहकार चळवळ, साखर कारखाने, दूध संघ, उद्योग आणि शिक्षणसंस्थांच्या बळावर आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेला पश्चिम महाराष्ट्र आहे; तर दुसऱ्या बाजूला दुष्काळ, पाणीटंचाई, कोरडवाहू शेती, बेरोजगारी, स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्यांनी त्रस्त असलेला मराठवाडा आहे. राज्याच्या स्थापनेनंतर सहा दशकांहून अधिक काळ लोटला, अनेक सरकारे आली-गेली, अनेक नेते मोठ्या पदांवर पोहोचले; पण मराठवाड्याच्या विकासातील अनुशेष आजही कायम आहे.

पश्चिम महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये ५० ते ७० टक्के जमीन सिंचनाखाली आली. त्यामुळे ऊस, द्राक्षे, डाळिंब, भाजीपाला यांसारख्या नगदी आणि बागायती पिकांची शेती विकसित झाली. याच शेतीच्या आधारावर साखर उद्योग, प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसाय उभा राहिला. दुसरीकडे मराठवाड्यात आजही सरासरी १५ ते २० टक्के क्षेत्रच सिंचनाखाली आहे. जवळपास ७० ते ८० टक्के शेती कोरडवाहू आहे. कापूस, सोयाबीन, तूर आणि बाजरी यांसारखी पिके पूर्णपणे पावसावर अवलंबून आहेत. पाऊस चांगला झाला तर शेतकरी जगतो, अन्यथा कर्ज आणि संकटाच्या गर्तेत अडकतो.

याच परिस्थितीचे सर्वात भयावह रूप शेतकरी आत्महत्यांमध्ये दिसते. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांमध्ये मराठवाड्याचा वाटा सातत्याने सर्वाधिक राहिला आहे. बीड, धाराशिव, परभणी, जालना, नांदेड आणि लातूर हे जिल्हे अनेकदा आत्महत्यांच्या आकडेवारीत आघाडीवर असतात. दरवर्षी शेकडो शेतकरी जीवन संपवतात. पिकांचे नुकसान, कर्जबाजारीपणा, अपुरा बाजारभाव, विम्याची अनिश्चितता आणि पाण्याची कमतरता यामुळे शेतकरी




मानसिकदृष्ट्या खचतो. पश्चिम महाराष्ट्रातही समस्या आहेत, परंतु सिंचन, दुग्धव्यवसाय, साखर उद्योग आणि पर्यायी उत्पन्न स्रोतांमुळे आर्थिक स्थैर्य तुलनेने अधिक आहे.

मराठवाड्याच्या दुर्दशेचे आणखी एक मोठे कारण म्हणजे रोजगाराचा अभाव. पुणे, कोल्हापूर, सांगली आणि सातारा या भागांत उद्योग, एमआयडीसी, आयटी कंपन्या आणि सेवा क्षेत्राचा मोठा विस्तार झाला. लाखो रोजगार निर्माण झाले. पण मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर आणि जालना वगळता मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक झाली नाही. परिणामी येथील युवकांना रोजगारासाठी पुणे, मुंबई, नाशिक, हैदराबाद किंवा राज्याबाहेर जावे लागते. बेरोजगारी इतकी गंभीर झाली आहे की अनेक ग्रामीण भागांत स्थिर उत्पन्न नसल्याने विवाहासाठीही अडचणी निर्माण होत आहेत.

दुष्काळामुळे होणारे स्थलांतर ही मराठवाड्याची आणखी एक वेदनादायक वस्तुस्थिती आहे. दरवर्षी लाखो मजूर ऊसतोडीसाठी पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकात स्थलांतर करतात. विशेषतः बीड जिल्हा ऊसतोड मजुरांचा सर्वात मोठा पुरवठादार म्हणून ओळखला जातो. अनेक कुटुंबे सहा ते आठ महिने गावाबाहेर राहतात. मुलांचे शिक्षण खंडित होते, महिलांवर अतिरिक्त ताण येतो आणि संपूर्ण कुटुंब अस्थिर जीवन जगते. पश्चिम महाराष्ट्रात मात्र रोजगाराच्या तुलनेने अधिक संधी उपलब्ध असल्याने असे मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर दिसत नाही.

मराठवाड्याच्या सर्व प्रश्नांच्या मुळाशी पाण्याचा प्रश्न उभा आहे. जायकवाडी धरण मराठवाड्याची जीवनवाहिनी म्हणून उभारले गेले. पण आजही मराठवाड्यातील शेकडो गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. दुष्काळी वर्षांत ५०० ते १,००० हून अधिक टँकर रस्त्यावर उतरतात. जनावरांसाठी शेकडो चारा छावण्या उभाराव्या लागतात. दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत शेती, उद्योग आणि शहरांसाठी तुलनेने मुबलक पाणी उपलब्ध असते. त्यामुळे पाण्याच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न सतत चर्चेत राहिला आहे.

याच पार्श्वभूमीवर अलीकडे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाची महत्त्वाची कार्यालये छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेड येथून अहमदनगर आणि नाशिककडे हलविण्याचा निर्णय चर्चेत आला. मराठवाड्याच्या पाण्याशी संबंधित निर्णय घेणारी कार्यालयेच मराठवाड्याबाहेर जात असतील तर भविष्यात पाण्यावरील नियंत्रण आणि निर्णय प्रक्रियेत या प्रदेशाचा आवाज आणखी कमकुवत होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. आज कार्यालये हलवली जात आहेत, उद्या निर्णय प्रक्रिया हलवली जाईल आणि परवा मराठवाड्याच्या पाण्यावरील हक्कही कमकुवत होतील, अशी भावना जनमानसात निर्माण झाली आहे.मात्र या सर्व परिस्थितीसाठी केवळ निसर्ग किंवा इतर प्रदेशांना दोष देऊन चालणार नाही. गेल्या अनेक दशकांत मराठवाड्यातून मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्य मंत्री, खासदार आणि शेकडो आमदार निवडून गेले. अनेकांनी सत्तेची मोठी पदे भूषवली. मग सिंचनाचा अनुशेष का भरून निघाला नाही? मोठे उद्योग का आले नाहीत? रोजगार का निर्माण झाला नाही? जायकवाडी आणि गोदावरी खोऱ्याच्या प्रश्नांवर मराठवाड्याचे नेतृत्व एकजूट का झाले नाही? हा प्रश्न आता जनतेने विचारण्याची वेळ आली आहे.आज पश्चिम महाराष्ट्रातील हिरवीगार बागायती आणि मराठवाड्यातील कोरडी शेती यांतील फरक हा केवळ निसर्गाचा परिणाम नाही. तो विकास धोरणातील असमतोल, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि आपल्या लोकप्रतिनिधींच्या अपयशाचीही कहाणी आहे. मराठवाड्याला दयेची गरज नाही, तर विकासातील न्याय्य वाट्याची गरज आहे. पाणी, उद्योग, शिक्षण, रोजगार आणि प्रशासनातील हक्काचे स्थान मिळाले तर हा प्रदेशही महाराष्ट्राच्या विकासात अग्रस्थानी येऊ शकतो. अन्यथा जायकवाडीपासून आत्महत्यांपर्यंतची ही वेदनादायी कहाणी पुढील पिढ्यांनाही सांगावी लागेल.

**-भरत पवार,**
**मो. ९८८१३२०८१०**

# सेवानिवृत्ती बद्दल सौ . बानोरे यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका.प्रतिनीधी. रणजितसिह. ठाकूर** : येथील भारत प्राथमिक मराठी शाळेतील सहाय्यक शिक्षिका सौ. कल्पना गजानन बानोरे ह्या नियतवयोमाना नुसार ३० मे रोजी सेवानिवृत्त झाल्या त्याबद्दल शाळेच्या वतीने निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. किरणताई दुबे सत्कारमूर्ती सौ. कल्पना बानोरे प्रमुख अतिथी गजानन बानोरे उपस्थित होते.

सर्वप्रथम व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलित करण्यात आला. शाळेच्या वतीने व्यासपीठावरील मान्यवरांचा मुख्याध्यापिका सौ. किरणताई दुबे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षिका पूजा लोंढे यांनी स्वागत गीत गाऊन स्वागत केल्यानंतर मुख्याध्यापिका सौ. किरणताई




दुबे यांनी सौ. कल्पना बानोरे व गजानन बानोरे या उभयंताचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन सत्कार केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना मुख्याध्यापिका दुबे म्हणाल्या की १९९३ मध्ये सहाय्यक शिक्षिका म्हणून सौ. कल्पना बानोरे रुजू झाल्या होत्या तब्बल ३३ वर्ष सेवा दिल्यानंतर आज त्या सेवानिवृत्त होत आहेत. शाळेत नोकरी करीत असताना विद्यार्थ्यांच्या समस्या, पालकांच्या समस्या वेळोवेळी जाणून घेऊन त्या सोडविल्या. आपल्या सहकारी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांना सौजन्याची वागणूक त्यांनी दिली.

आपल्या सत्काराला उत्तर देताना सौ. बानोरे म्हणाल्या की शाळा म्हणजे माझ्यासाठी एक घरच होते. ३३ वर्षाच्या काळात या परिसरातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापिका यांचे सहकार्य लाभल्यामुळे मी माझी ३३ वर्षाची सेवा यशस्वीरित्या पूर्ण करू शकले. येथून निरोप घेताना शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई देशमुख, माननीय अनंतरावजी देशमुख, ॲड. नकुलदादा देशमुख, अमृताताई देशमुख, चैतन्यभैय्या देशमुख इत्यादींचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

तसेच याप्रसंगी शिक्षिका सौ. जयश्रीताई दुबे, मोनिका भांदुर्गे, शिक्षक ए. बी. देशमुख पंजाबराव देशमुख, गजानन बानोरे इत्यादींची समायोजित भाषणे संपन्न झाली. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका पूजा लोंढे यांनी तर आभार शिक्षक प्रवीण देशमुख यांनी मानले.

# गोविंदराव पवार विदयालयसमोर माजी प्राचार्यांचे उपोषण सुरु
## संस्थेच्या कामकाजावर गंभीर आरोपांची चौकशी करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : फुले एज्युकेशन सोसायटीच्या गोविंदराव पवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,भवानीनगरचे सेवानिवृत्त प्राचार्य मच्छिंद्र दगडू बनसोडे यांनी संस्थेच्या कारभारावर गंभीर आरोप करत १ जून २०२६ पासून आपल्या वाढदिवशी शाळेसमोर बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले आहे.

बनसोडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांनी १९८९ ते ३१ मे २०२३ या कालावधीत तब्बल ३३ वर्षे प्राचार्य म्हणून सेवा बजावली.मात्र सेवानिवृत्तीनंतर संस्थेतील एका कर्मचाऱ्याच्या माध्यमातून स्वतःसह कुटुंबीयांची अश्लील पत्रांद्वारे बदनामी करण्यात आली.या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



याशिवाय संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,सचिव व इतर पदाधिकाऱ्यांवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.संस्थेचे पदाधिकारी आणि शिक्षक अशी दुहेरी भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींमुळे कर्मचाऱ्यांवर दबाव निर्माण होत असल्याचा आरोप करत माहिती सांगण्यात आली या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करून उपोषणास सुरवात करण्यात आली आहे.उपस्थितासमोर बोलताना बनसोडे यांनी संस्थेच्या नियामक मंडळ यांच्या आर्थिक बाबीचा विषय मांडला यावेळी सणसर गावचे सरपंच यशवंत नरुटे पाटील,माजी सरपंच ॲड रणजित निंबाळकर माजी संचालक सुभाष झगडे पै.अजित सोनवणे बांधकाम कामगार तालुका अध्यक्ष शब्बीर काझी मोहन सुरडकर यांनी पाठिंबा देत आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगण्यात आले यावेळी शिंदेवाडी गावचे माजी सरपंच सावता बोराटे राजाभाऊ जाधव, शहाजी झगडे,अजीजभाई तांबोळी,प्रतिक ढाकणे,गजेंद्र मोरे आजी माजी विद्यार्थी पालक परिसरातील युवक व सामाजिक कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# विजय शेंडगे यांचा प्रशासनाला इशारा; अहिल्यादेवी जयंतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या ग्रामपंचायती अडचणीत ?

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव महाराष्ट्र शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मालेगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये साजरी करण्यात आली नसल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, या प्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. जयंती न साजरी करणाऱ्या संबंधित ग्रामसेवक व सरपंचांवर कठोर कारवाई करण्याची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली असून, कारवाई न झाल्यास ४ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्या कार्यालयात आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शिवसेनेचे उपतालुका प्रमुख विजय पंडितराव शेंडगे यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनामुळे पंचायत समिती व ग्रामपंचायत प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. शासनाने महापुरुषांच्या जयंती उत्सवांबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही अनेक ग्रामपंचायतींनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचा समावेश अधिकृत महापुरुषांच्या यादीत केला आहे. त्यानुसार ग्रामपंचायत स्तरावर प्रतिमापूजन, अभिवादन



व विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे अपेक्षित होते. मात्र अनेक ग्रामपंचायतींमध्ये हा कार्यक्रम पार पडला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे केवळ एका थोर महापुरुषाच्या जयंतीकडे दुर्लक्ष झाले नसून शासनाच्या आदेशालाच आव्हान दिल्याचे चित्र निर्माण झाले आहे. "शासनाचा जीआर फक्त कागदावरच राहणार का?" असा सवाल आता जनतेमधून उपस्थित होत आहे.

शिवसेनेने आपल्या निवेदनात ज्या ग्रामपंचायतींमध्ये जयंती साजरी झाली असल्याचा दावा केला जात आहे, त्या ठिकाणचे फोटो, व्हिडिओ व नोंदींची पडताळणी करण्याची मागणी केली आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतींमध्ये जयंती साजरी झाली नाही, त्या ठिकाणच्या ग्रामसेवक आणि सरपंचांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर निलंबनासह शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी ठाम भूमिका मांडली आहे.

विशेष म्हणजे, विजय शेंडगे यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, "पुण्यश्लोक राजमाता

### जयंती न साजरी करणाऱ्या ग्रामसेवक व सरपंचांवर कठोर कारवाईची मागणी; दखल न घेतल्यास ४ जूनला CEO कार्यालयात आत्मदहनाचा इशारा

> **"अहिल्यादेवी होळकर यांच्यासारख्या लोकमाता आणि राष्ट्रप्रेरणेच्या प्रतीक असलेल्या महान व्यक्तिमत्त्वाच्या जयंतीकडे दुर्लक्ष करणे हे अत्यंत गंभीर आहे. शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. अन्यथा शिवसेना जनतेला सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडेल. महापुरुषांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही."**
>
> **– विजय शेंडगे**
> **उपतालुका प्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मालेगाव**

अहिल्यादेवी होळकर यांचा अपमान करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई केली नाही, तर ४ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयात आत्मदहन करण्यात येईल." या इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले असून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार आणि मालेगाव पोलीस स्टेशन यांनाही देण्यात आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.दरम्यान, शिवसेनेच्या या आक्रमक भूमिकेमुळे मालेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासनात चांगलीच धावपळ सुरू झाल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी जयंती साजरी झाल्याचे पुरावे व नोंदी गोळा करण्यासाठी हालचाली सुरू असल्याचे बोलले जात आहे. चौकशी झाल्यास अनेक ग्रामपंचायतींचे पितळ उघडे पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि विकासाभिमुख कारभारातून इतिहासात अजरामर स्थान निर्माण केले. अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या जयंतीबाबत निष्काळजीपणा दाखवणाऱ्या जबाबदार घटकांवर कारवाई झाली पाहिजे, अशी भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.आता गटविकास अधिकारी आणि जिल्हा प्रशासन या निवेदनाची कितपत गंभीर दखल घेतात, दोषींवर कारवाई होते का आणि शिवसेनेच्या इशाऱ्यानंतर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण मालेगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बणजारा विरासत संघाच्या सदस्य नोंदणी अभियानात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे . :– एस .एस .जाधव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** बंजारा समाजातील युवक, विद्यार्थी, महिला व नागरिकांना संघटित करण्याच्या उद्देशाने बंजारा विरासत संघाच्या सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ करण्यात आला असून या अभियानाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. समाजाची एकजूट, शैक्षणिक प्रगती , युवक सक्षमीकरण आणि सामाजिक विकास या उद्देशाने प्रत्येक घरातून किमान एक सदस्य बंजारा विरासत संघाशी जोडला जावा, असे आवाहन राष्ट्रीय बंजारा युवा परिषदचे तालुकाध्यक्ष शैलेश




भैय्या जाधव यांनी केले आहे. मा.संजयभाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून समाजातील युवकांनी संघटित होऊन समाजहिताच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे ही त्यांनी नमूद केले. शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, सामाजिक न्याय आणि समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी मजबूत संघटन ही काळाची गरज आहे. त्या मुळे बंजारा समाजातील युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सदस्य नोंदणी करून अभियान यशस्वी करावे. असे आवाहन करण्यात आले आहे. " संघटन मजबूत- समाज सक्षम " या ध्येयाने सुरू करण्यात आलेल्या या अभियानात समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

असे ही आवाहन राष्ट्रीय बंजारा युवा परिषदचे तालुकाध्यक्ष शैलेश शंकरराव जाधव यांनी केले.

# पर्यटन उद्योजकांसाठी आज ‘अमृत’तर्फे कौशल्य विकास कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त ‘अमृत’ संस्थेच्या पर्यटन विकास उपक्रमांतर्गत, पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक आणि नवउद्योजकांसाठी आज, मंगळवार (दि. २ जून) रोजी विशेष ‘कौशल्य विकास कार्यशाळेचे’ आयोजन करण्यात आले आहे.ही कार्यशाळा सकाळी ११ वाजता पुंडलिक नगर रोड, सेक्टर-४, सिडको (पाण्याच्या टाकीजवळ) येथील अमृतच्या विभागीय कार्यालयात पार पडणार आहे.या उपक्रमाद्वारे राज्यातील पर्यटन स्थळे, सेवा आणि स्थानिक उत्पादनांना चालना देण्याचे उद्दिष्ट आहे. कार्यशाळेत प्रवास आणि पर्यटन व्यावसायिक , मार्गदर्शक, खाद्यपदार्थ पुरवठादार, निवास व्यवस्था (होमस्टे) व रिसॉर्ट चालक, तसेच धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक सहभागी होऊ शकतात. कार्यक्रमात व्यवसाय नियोजन, डिजिटल जाहिरात तंत्र , ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन आणि शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती तज्ज्ञांकडून दिली जाणार आहे.क्षेत्रातील अनुभवी व्यावसायिकांकडून मार्गदर्शनासोबतच पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधींची ओळख करून दिली जाईल. पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व व्यावसायिक आणि इच्छुक युवक-युवतींनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ‘अमृत’ संस्थेतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी संपर्क: ७३९१०६५४७५, ९४०३२००६०६.

# खतासाठी शेतकऱ्यांची फरफट; अधिकाऱ्यांच्या एका फोनने मिळाले डीएपी!

## संवेदनशील कृषी अधिकारी कैलास देवकर व श्री.डुकरे यांच्या तत्परतेमुळे शेतकऱ्यांना दिलासा; मात्र खत वितरण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : खरीप हंगाम तोंडावर आला असताना मालेगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांना डीएपी खतासाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एकीकडे देशाला कृषिप्रधान देश म्हणून गौरविले जाते, तर दुसरीकडे अन्नदाता शेतकऱ्यांना खतासाठी कृषी सेवा केंद्रांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ही परिस्थिती खरंच चिंताजनक असून कृषी व्यवस्थेतील विसंगती अधोरेखित करणारी आहे.पिंपळा गावातील काही शेतकरी बांधव डीएपी खत खरेदी करण्यासाठी किन्हीराजा येथील कृषी सेवा केंद्रांमध्ये गेले असता त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. संबंधित दुकानदारांकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. "साठा कमी आहे", "आमच्या शेतासाठी खत राखून ठेवावे लागते", "आमच्या माणसांना




द्यायचे आहे", "दोन-तीन दिवसांनी या", तसेच "खताचा साठा आला आहे पण ऑनलाईन नोंदणी झालेली नाही" अशी विविध कारणे सांगून शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परत पाठवण्यात आले.

या प्रकारामुळे हतबल झालेल्या शेतकरी बांधवांनी दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे यांच्याशी संपर्क साधून आपली व्यथा मांडली. त्यानंतर करण धोंगडे यांनी मालेगावचे तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर साहेब यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. शेतकऱ्यांच्या अडचणीबाबत संवेदनशील भूमिका घेत देवकर साहेब यांनी तत्काळ सहकार्य करत संबंधित विभागातील अधिकारी श्री.डुकरे साहेब यांचा संपर्क उपलब्ध करून दिला. यानंतर श्री.डुकरे साहेब यांच्याशी संपर्क साधून शेतकरी बांधवांना तातडीने डीएपी खत उपलब्ध करून

> **"अधिकाऱ्यांचा फोन आल्यानंतर काही क्षणांत खत मिळत असेल, तर सर्वसामान्य शेतकऱ्यांना का फिरवले जाते? खत वितरणात पूर्ण पारदर्शकता आणून दोषींवर कारवाई करण्यात यावी."**
> **— संतप्त शेतकरी बांधव, पिंपळा**
>
> **कौतुकास पात्र अधिकारी**
> **मालेगावचे तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर साहेब आणि अधिकारी श्री.डुकरे साहेब यांनी शेतकऱ्यांची अडचण समजून घेत तात्काळ हस्तक्षेप केला. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शेतकऱ्यांना वेळेत डीएपी खत मिळाले. शेतकरी हिताला प्राधान्य देणारे असे अधिकारी प्रशासनातील आशेचा किरण असल्याची भावना शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.**

देण्याची मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांची अडचण समजून घेत श्री.डुकरे साहेब यांनी अत्यंत सकारात्मक व प्रेमळ प्रतिसाद देत संबंधित कृषी दुकानदारांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि शेतकऱ्यांना त्वरित खत उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. विशेष म्हणजे अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर पिंपळा गावातील शेतकरी बांधवांना तात्काळ डीएपी खत उपलब्ध करून देण्यात आले.

या संपूर्ण प्रकरणात मालेगाव तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर साहेब व अधिकारी श्री. डुकरे साहेब यांनी दाखविलेली तत्परता आणि शेतकरीहिताची भूमिका कौतुकास्पद ठरली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून त्यावर तातडीने उपाययोजना करणारे असे अधिकारी कृषी विभागात असल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळत आहे. अशा संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळेच प्रशासनावरील विश्वास टिकून असल्याची भावना अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत.

मात्र या घटनेमुळे काही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अधिकाऱ्यांचा फोन आल्यानंतर काही मिनिटांत खत उपलब्ध होत असेल, तर सामान्य शेतकऱ्यांना वारंवार हेलपाटे का मारावे लागतात? दुकानदारांकडून दिली जाणारी कारणे कितपत खरी आहेत? खताचा साठा नेमका किती आहे? वितरणात पारदर्शकता का नाही? असे अनेक सवाल आता शेतकरी बांधवांकडून उपस्थित केले जात आहेत.सध्या मालेगाव तालुक्यातील अनेक कृषी सेवा केंद्रांमध्ये एका आधार कार्डवर केवळ चार पोती डीएपी खत दिले जात असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे मोठ्या क्षेत्रात पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर अतिरिक्त अडचणी निर्माण होत आहेत. खरीप हंगामाच्या तोंडावर खताचा पुरेसा व सुरळीत पुरवठा होणे अत्यावश्यक असताना शेतकऱ्यांना होणारी ही धावपळ चिंताजनक आहे.

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून जगभर ओळखला जातो. मात्र या कृषिप्रधान देशातील अन्नदाता शेतकऱ्यांनाच खत आणि बियाण्यासारख्या मूलभूत बाबींसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ती निश्चितच व्यवस्थेची शोकांतिका म्हणावी लागेल. शेतकरी सुखी तर देश समृद्ध, असे आपण म्हणतो; पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना आवश्यक कृषी निविष्ठांसाठीही संघर्ष करावा लागत असल्याचे हे उदाहरण आहे.

कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन खत वितरण व्यवस्थेची चौकशी करावी, उपलब्ध साठ्याची माहिती सार्वजनिक करावी तसेच शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देणाऱ्या संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आता शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. आगामी काळात कृषी विभाग या प्रश्नावर कोणती भूमिका घेतो याकडे संपूर्ण तालुक्यातील शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

# माहिती अधिकार कार्यकर्ता संघ, उरण तालुका सदस्यांची बैठक उत्साहात संपन्न ; प्रशिक्षण कार्यशाळा व नवीन कार्यकारिणीवर शिक्कामोर्तब !

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : माहिती अधिकार कार्यकर्ता संघ, उरण तालुक्याची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाली. संघाच्या पुढील वाटचालीची दिशा, नवीन कार्यकारिणी रचना, सामाजिक विषयांवरील कामकाज तसेच नवीन कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याबाबत बैठकीत सविस्तर व सखोल चर्चा करण्यात आली. माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे, शासकीय कार्यालयांमधील पारदर्शकता वाढवणे, नागरिकांच्या समस्या योग्य पद्धतीने संबंधित प्रशासनापर्यंत पोहोचवणे आणि सामाजिक हिताच्या विषयांवर संघटितपणे काम करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. बैठकीत नवीन कार्यकारिणी संदर्भात चर्चा करून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संघटक, मीडिया प्रमुख अशी विविध पदे निश्चित करण्यात आली. संघाच्या कामकाजात शिस्त, जबाबदारी आणि प्रभावी समन्वय राहावा यासाठी पदनिहाय जबाबदाऱ्या



निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. उरण तालुक्यातील विविध सामाजिक प्रश्नांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. यामध्ये नागरिकांच्या मूलभूत समस्या, शासकीय योजना, ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाशी संबंधित विषय, रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, भ्रष्टाचारविरोधी जनजागृती तसेच नागरिकांना माहिती अधिकार कायद्याद्वारे मदत करण्याच्या विषयांचा समावेश होता.संघाच्या सदस्यांसाठी तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेल्या कार्यकर्त्यांसाठी लवकरच एक विशेष माहिती अधिकार प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या कार्यशाळेत माहिती अधिकार अर्ज कसा करावा, प्रथम अपील व द्वितीय अपील प्रक्रिया, अर्ज लिहिताना घ्यावयाची काळजी, कायदेशीर तरतुदी, वेळेची मर्यादा, कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यांचे निराकरण अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.माहिती अधिकार कायदा हा सर्वसामान्य नागरिकांच्या हातातील प्रभावी लोकशाही साधन असून, त्याचा योग्य व विधायक वापर करून समाजहिताचे काम अधिक सक्षमपणे करता येते, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला. उरण तालुक्यात माहिती अधिकार चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार सदस्यांनी व्यक्त केला. उरण तालुक्यातील इच्छुक कार्यकर्ते, नागरिक तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेले कार्यकर्ते यांनी अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संघातर्फे करण्यात आले आहे.

**संपर्क : श्री. सुनील जोशी — 8286442067**

**माहिती अधिकार, जनतेचा अधिकार — सजग नागरिकांसाठी संघटित प्रयत्न!**

# उरण–मोरा रस्ता मृत्यूचा सापळा? भीषण अपघातात दोन तरुणांचा बळी ; प्रशासकीय उदासीनतेविरोधात उरणकरांचा संताप !

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी** : गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते सुरक्षेच्या प्रतीक्षेत असलेल्या उरण-मोरा मार्गावर अखेर सोमवारी पहाटे आणखी एका भीषण रक्ताचा सडा पडला. एका दुर्दैवी अपघातात दोन निष्पाप तरुणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेली गतिरोधकांची मागणी आता थेट आंदोलनाच्या पवित्र्यात समोर येत आहे.

सोमवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास मोरा रस्त्यावरील कैलासवासी हरिश्चंद्र गावंड उद्यानाजवळ हा थरार घडला. बोरी मागीर देव परिसर डोंगराळी उरण चे रहिवासी महेश प्रल्हाद चांदेकर





(वय ३५) आणि शिवसागर आपारमेंट नागाव पोलीस लाईन परिसरातील निखिल दिपक कुकडे (वय ३८) या दोन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भयानक होता की दोघांना सावरण्याची किंवा उपचाराची कोणतीही संधी मिळाली नाही.

पहाटेच्या वेळी रस्त्यावर शुकशुकाट असल्याने या अपघाताचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक झाली असेल याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. उरण पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा र.नं. १६६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांखाली (कलम १०६(१), १२५(ब), २८१, ३०४(अ), ३३८, २७९, १८४) गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नेमके सत्य काय आहे, हे पोलिसांच्या सखोल तपासानंतरच समोर येईल.

हा अपघात म्हणजे प्रशासकीय निष्काळजीपणाचा ढळढळीत नमुना असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे मोरा मार्गावरील धोकादायक वळणांवर आणि गर्दीच्या ठिकाणी गतिरोधक बसवण्यासाठी नागरिकांनी अनेकदा प्रशासनाचे दरवाजे ठरवले परंतु कधी तांत्रिक कारणांचे तर कधी राजकीय उदासीनतेचे कारण पुढे करत हा प्रश्न फाईल बंद ठेवण्यात आला जर वेळेत गतिरोधक बसवले असते तर आज दोन सुशिक्षित तरुणांचे प्राण वाचले असते दोन कुटुंबे उध्वस्त झाली नसती अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक करत आहेत. नेत्यांच्या अंतर्गत वादांमुळे सामान्य जनतेचा सुरक्षेचा प्रश्न मात्र आजही वाऱ्यावरच आहे महेश आणि निखिल यांच्या आखाली जाण्याने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे आता तरी प्रशासन या अपघातातून धडा घेऊन मोरार व मार्गावर तातडीने सुरक्षा उपाययोजना करणार का? हाच खरा मोठा प्रश्न आहे.

# धार्मिक व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व हरपले; कै. गोपीनाथ फसले काळाच्या पडद्याआड

## बापूसाहेब फसले यांना पितृशोक

**दौलावडगाव, ता. आष्टी :**
दौलावडगाव येथील ज्येष्ठ नागरिक, धार्मिक वृत्तीचे, समाजात आदरांचे स्थान असलेले तसेच गावचे शेवटचे वंशपरंपरागत पोलीस पाटील **कै. गोपीनाथ बाबुराव फसले (पाटील)** यांचे शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे दौलावडगावसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै. गोपीनाथ फसले यांनी आयुष्यभर साधी रहाणी, प्रामाणिकपणा, धार्मिकता आणि समाजसेवेची कास धरली. शांत, संयमी व मनमिळावू स्वभावामुळे त्यांना गावात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले होते. गावातील धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असे. सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे अंबंध ठेवणारे आणि गावाच्या परंपरा व सामाजिक ऐक्य जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती.

त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



- त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. बापूसाहेब गोपीनाथ फसले हे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा दादेगाव येथे शिक्षक म्हणून कार्यरत असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय आहेत.
- दुसरे चिरंजीव श्री. अंकुश गोपीनाथ फसले हे जवाहर नवोदय विद्यालय, पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) येथे माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.
- तर तिसरे चिरंजीव श्री. लखुजी गोपीनाथ फसले हे भारतीय सैन्य दलातून जे.सी.ओ. पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.

कै. फसले यांची अपत्ये विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून त्यांच्या कुटुंबातील शिक्षण व सेवाभावाची परंपरा विशेष उल्लेखनीय आहे. दहा नातवंडांपैकी नऊ नातवंडे विविध शासकीय सेवेत कार्यरत असून ही बाब त्यांच्या कुटुंबाच्या संस्कारांची साक्ष देणारी आहे.

**दशक्रिया विधी**
कै. गोपीनाथ बाबुराव फसले यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी अमरधाम, दौलावडगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथे संपन्न होणार आहे.

# अखेर मखमली सूर थांबले; संगीत विश्वावर शोककळा!; जेष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रदीप पाटील** : आपल्या सुरेल आवाजाने चाहत्यांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्याआणि लाखो हृदयांचा ठाव घेणाऱ्या जेष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूरयांचे रविवार दिनांक 31 मे 2026 रोजी दु:खद निधन झाले,निधनसमयी त्या वयाच्या 89 वर्षाच्या होत्या त्यांच्या निधनाने संगीत विश्वावर शोककळा पसरली असून मराठी,हिंदीचित्रपट सृष्टींतील दिग्जजा पासून राजकीय नेत्यांपर्यंत अनेकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

प्रसिद्ध गायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुखद आहे. सुमन कल्याणपूर यांच्या गाण्यात माधुर्य होते, तरल भाव होता व पावित्र्य होते. त्यांनी गायलेले प्रत्येक गीत थेट हृदयाला भिडणारे होते. त्यांच्या निधनाने संगीत जगतातील पवित्र देव्हारा रिकामा झाला आहे अशीच सर्वांची भावना आहे. सुमन कल्याणपूर यांचे संगीत अजरामर आहे. राज्यातील जनतेच्या तसेच संगीत रसिकांच्या वतीने मी दिवंगत सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व आपल्या शोकसंवेदना त्यांच्या कुटुंबियांना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.



सुमन कल्याणपूर यांचा जन्म 28 जानेवारी 1937 रोजी बाग्लादेश भवानीपूर येथे झाला,वडिलांचे नाव शंकरराव हेमाडी, आईचे नाव सीताबाई हेमाडी असे असून बालपणा पासून संगीताची आवड असल्याने सुरवातीस सुमन हेमाडी या नावाने त्यांनी भावगीते गायली त्याच्या भवगीतांच्या गाण्याचा शुभारंभ ग.दि.माडगूळकर यांच्या भावगीता पसून झाला त्यावेळी त्यांना पुलस्मृती पुरस्काराने गौरवविण्यात आले होते.27एप्रिल 1958 रोजी त्यंच अविवाह रामानंद कल्याणपूर यांच्या बरोबर झाला त्यानंतर खऱ्या अर्थाने सुमन कल्याणपूर या नावाने त्यांनी अखेर पर्यंत भावगीत.भजन. मराठी,हिंदी,गुजराथी.बंगाली,कन्नड, राजस्थानी, पंजाबी आणि ओडिसी या भाषेमध्ये अनेक गाणी गायली आहेत.त्यांचा आवाजगान सम्रज्ञी लतादीदी यांचा आवाज बरोबर मिलता जुळता होता.त्यामुळे त्या नेहमी व्यथित होत्या. .हिंदी चित्रपटात बरसातकी रात,जहॉं अरा, पाकिजा, नूरजहॉं,मेरेसनम,मोहब्बत जिंदगी है,जब जब फुल खिले,दिल एक मंदिर,गित,नसीब,अनजांना,अपाये भर ई,सच्चाझुटा,अनमिलो सजना.जीनेकी रह,आरजू, राजकुमार, यांतील' ना ना करते', 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे"तुमने पुकारा'अशा प्रकारच्या हित गीताबरोबर हिंदी चित्रपटांतील सुमारे 850 ते900 गाणी आणि इतर भेंतील सुमारे 750 ते 800 गाणी त्यांनी आपल्या उमेदीच्या काळात गायली आहेत. त्यांच्या संगीत क्षेत्रातील कामगिरीची दखल घेऊन त्यांचे संगीत क्षेत्रातील योगदान हे अविस्मरणीय आल्याने त्यांना 2023 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.वाढत्या वया बरोबर वाढत जाणाऱ्या शारीरिक तक्रारी मुळे रविवार दिनांक 31 मे 2026 रोजी सायंकाळी वृद्धापकाळानेत्यांचे वयाच्या 89 वर्षी दु:खद निधन झाले, आणि "अखेर मखमली सूर थांबले;न फुलेले लोकप्रीयतेचे सुमनपरमेश्वराच्या चरणी विलीन झाले

हिंदी चित्रपटात बरसातकी रात,जहॉं अरा, पाकिजा, नूरजहॉं,मेरेसनम,मोहब्बत जिंदगी है,जब जब फुल खिले,दिल एक मंदिर,गित,नसीब,अनजांना,अपाये भर ई,सच्चाझुटा,अनमिलो सजना. जीनेकी रह,आरजू, राजकुमार, यांतील' ना ना करते', 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे"तुमने पुकारा'अशा प्रकारच्या हित गीताबरोबर हिंदी चित्रपटांतील सुमारे 850 ते900 गाणी आणि इतर भेंतील सुमारे 750 ते 800 गाणी त्यांनी आपल्या उमेदीच्या काळात गायली आहेत. त्यांच्या संगीत क्षेत्रातील कामगिरीची दखल घेऊन त्यांचे संगीत क्षेत्रातील योगदान हे अविस्मरणीय आल्याने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.वाढत्या व्या बरोबरवाढत जाणाऱ्या शारीरिक तक्रारी मुळे रविवार दिनांक 31 मे 2026 रोजी सायंकाळीत्यांचे वयाच्या 89 वर्षी दु:खद निधन झाले,

# संभाजी ब्रिगेडच्या शक्तीप्रदर्शनाने राजकीय पक्षांची वाढली धडधड; युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारा आणि अनेक प्रस्थापित पक्षांच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण करणारा संभाजी ब्रिगेडचा भव्य पक्षप्रवेश सोहळा आज स्थानिक विश्राम भवन येथे उत्साहात पार पडला. जिल्हाभरातून आलेल्या शेकडो युवकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संभाजी ब्रिगेडमध्ये जाहीर प्रवेश करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रणशिंग फुंकले.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोजदादा आखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हाध्यक्ष गजानन भोयर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मेळाव्याने संघटनेची वाढती ताकद अधोरेखित केली. सभागृहात "जय जिजाऊ, जय शिवराय" च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

"जिथे तरुणाई जागी होते, तिथे परिवर्तनाची पहाट उगवते", या भावनेने प्रेरित होत अनेक युवकांनी आज संभाजी ब्रिगेडची वाट निवडली. बदलाची आस असलेल्या तरुणांचा वाढता सहभाग हा जिल्ह्याच्या राजकारणासाठी नवा संदेश मानला जात आहे.

कार्यक्रमात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन मजबुतीकरण, गावपातळीवरील बांधणी आणि प्रत्येक जिल्हा परिषद सर्कलमध्ये पक्षाचे जाळे उभे करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. "गावं तिथे कार्यकर्ता" या मोहिमेचा आढावा घेत प्रत्येक गावात विचारांचा झेंडा फडकविण्याचे आवाहन करण्यात आले.

मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोजदादा आखरे म्हणाले की, आज जनतेचा विश्वास केवळ आश्वासनांवर नाही तर कृतीवर आहे. अनेक राजकीय पक्षांतील स्वार्थी पक्षांतरामुळे जनता त्रस्त झाली आहे. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणाऱ्या संभाजी ब्रिगेडकडे लोक आशेने पाहत आहेत.ते पुढे म्हणाले, "सत्ता ही आमचे अंतिम ध्येय नसून समाजपरिवर्तन हेच



आमचे मिशन आहे. जे तरुण इतिहास घडवण्याची जिद्द ठेवतात, त्यांनाच भविष्य नेतृत्वाची संधी देते."जिल्हाध्यक्ष गजानन भोयर यांनी सांगितले की, संभाजी ब्रिगेड आता केवळ आंदोलन करणारी संघटना राहिलेली नाही, तर पर्यायी नेतृत्व निर्माण करणारी ताकद बनत आहे. युवक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर संघटनेशी जोडले जात असून आगामी काळात प्रत्येक गावात सक्षम संघटन उभी राहणार आहे."विचारांची ताकद जेव्हा संघटनेच्या शक्तीशी जोडली जाते, तेव्हा इतिहास घडतो," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात जिल्हा कार्यकारिणीची निवड, तालुकाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या तसेच विविध गावांतील कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे आगामी निवडणुकांसाठी संभाजी ब्रिगेडची संघटनात्मक तयारी अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसून आले.राजकीय जाणकारांच्या मते, जिल्ह्यात युवकांचा वाढता कल आणि मोठ्या प्रमाणावरील पक्षप्रवेश पाहता आगामी निवडणुकांमध्ये अनेक पारंपरिक राजकीय समीकरणांना तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाजी ब्रिगेडच्या वाढत्या प्रभावामुळे प्रस्थापित पक्षांमध्ये अस्वस्थता वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष अमर पाटील, पांडुरंग पाटील, अकोला जिल्हाध्यक्ष नमन आंबेकर, ज्येष्ठ मार्गदर्शक संतोष भिसडे, जिल्हा महासचिव विठ्ठल गंगावणे, सोशल मीडिया प्रमुख महेश देवळे, संपर्कप्रमुख गणेश सुर्वे, कार्याध्यक्ष गजानन खंदारे, संघटक श्रीकृष्ण शिंदे, प्रवक्ते विकास देशमुख, कोषाध्यक्ष नितेश पोहकर, प्रवक्ते राहुल बलखंडे, रमेश मुंजे, विजय झुंजारे, शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष विष्णूभाऊ भोयर, शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष परमेश्वर काळबांडे, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष इस्माईल खान पठाण, महिला आघाडी जिल्याध्यक्षा स्वातीताई भिमटे, दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष बंडू भगत, तालुकाध्यक्ष तानाजी काळबांडे, अजय गवारगुरु, विनोद जाधव यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप "जय जिजाऊ, जय शिवराय", "संभाजी ब्रिगेडचा विजय असो" आणि "संविधानाचा विजय असो" अशा जोशपूर्ण घोषणांनी करण्यात आला. या भव्य पक्षप्रवेश सोहळ्यामुळे वाशिम जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडच्या संघटनात्मक ताकदीची जोरदार चर्चा सुरू झाली असून आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचे राजकीय वजन वाढण्याचे संकेत मिळत आहेत.

**"युवकांचा हा उस्फूर्त प्रतिसाद केवळ पक्षप्रवेश नाही, तर परिवर्तनाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणारी प्रत्येक तरुण शक्ती संभाजी ब्रिगेडसोबत येत आहे. आगामी काळात हीच ऊर्जा महाराष्ट्राच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण करेल."**

**— ॲड. मनोजदादा आखरे**
**प्रदेशाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड**

**"आजचा मेळावा हा केवळ कार्यक्रम नसून संघटनशक्तीचा महापूर आहे. युवकांचा वाढता सहभाग आणि कार्यकर्त्यांची निष्ठा पाहता आगामी निवडणुकांमध्ये संभाजी ब्रिगेडला दुर्लक्षित करणे कोणत्याही पक्षाला सहज शक्य होणार नाही."**

**— गजानन पाटील भोयर**
**जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, वाशिम**

## पनवेलच्या कल्पतरू रिव्हरसाईडची हरित ऊर्जा क्रांती ; ४०० किलोवॅट सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** नवी मुंबई व पनवेल परिसरातील पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी ओळखल्या जाणाऱ्या पनवेलमधील कल्पतरू रिव्हरसाईड या भव्य निवासी संकुलाने शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आणखी १०० किलोवॅट क्षमतेच्या नव्या सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन यशस्वीरीत्या केले. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. यापूर्वी या संकुलात ३०० किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली होती. त्या प्रकल्पाचे उद्घाटन आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले होते. नव्या १०० किलोवॅट प्रकल्पामुळे आता संकुलाची एकूण सौरऊर्जा निर्मिती क्षमता ४०० किलोवॅटपर्यंत पोहोचली असून, महाराष्ट्रातील निवासी गृहनिर्माण क्षेत्रातील सर्वात मोठ्या सौरऊर्जा उपक्रमांपैकी हा एक प्रकल्प मानला जात आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कल्पतरू



रिव्हरसाईड हे निवासी संकुल नवी मुंबईतील आदर्शवत आणि पर्यावरणस्नेही सोसायटी म्हणून पुढे आले आहे. ४०० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करणाऱ्या महाराष्ट्रातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये या आदर्श सोसायटीचा अग्रक्रमाने समावेश होत असून, त्या अनुषंगाने राज्यातील अशा पहिल्या तीन प्रमुख गृहनिर्माण सोसायट्यांपैकी एक म्हणून तिची नोंद घेतली जात आहे.

सौरऊर्जेचा वाढता वापर, पर्यावरण संवर्धनाची बांधिलकी आणि ऊर्जा बचतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम यांमुळे कल्पतरू रिव्हरसाईड इतर गृहनिर्माण संकुलांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. सुमारे ८५० कुटुंबांचे वास्तव्य असलेल्या कल्पतरू रिव्हरसाईडमध्ये ओला व सुका कचरा व्यवस्थापन, कंपोस्ट निर्मिती, सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प, पुनर्वापरित पाण्याचा वापर, व्यापक वृक्षारोपण आणि विविध पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. त्यामुळे हे संकुल 'ग्रीन कम्युनिटी'चे आदर्श उदाहरण म्हणून ओळखले जाते. ४०० किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली कार्यान्वित झाल्याने सोसायटीच्या वीज खर्चात मोठी बचत होणार असून दरवर्षी सुमारे ८० लाख ते ०१ कोटी रुपयांपर्यंत बचत अपेक्षित आहे. त्याचबरोबर राज्याच्या वीज वितरण व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठीही हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावणार आहे. यावेळी अध्यक्ष प्रशांत बाळाराम ठाकूर यांनी या प्रकल्पाच्या यशाचे श्रेय मिलिंद कुलकर्णी, अभिजित पाटील आणि सतीश पिल्ले यांना देत सांगितले की, "ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. कल्पतरू रिव्हरसाईडने समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हरित ऊर्जा निर्मितीच्या दिशेने वाटचाल करू इच्छिणाऱ्या कोणत्याही गृहनिर्माण संस्थेला आमच्या अनुभवाचा लाभ देण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत. महाराष्ट्रातील अधिकाधिक सोसायट्या ऊर्जा स्वावलंबी व्हाव्यात, ही आमची भूमिका आहे. प्रमुख मान्यवर म्हणून बोलताना नगरसेवक परेश ठाकूर यांनी कल्पतरू रिव्हरसाईडच्या व्यवस्थापन समितीचे कौतुक करताना सांगितले की, "८५० कुटुंबांचे हे विशाल संकुल म्हणजे स्वतःमध्ये एक छोटे शहर आहे.

अशा ठिकाणी सर्वांना सोबत घेऊन पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर प्रकल्प यशस्वीपणे राबविणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. या कार्यक्रमास सोसायटीचे सचिव नितीन ठाकूर, खजिनदार पुरुषोत्तम तळेकर, व्यवस्थापन समिती सदस्य, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने रहिवासी उपस्थित होते.

## अकोला येथे पाटील समाज वधुवर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोला प्रतिनिधी :** पाटील वेल्फेअर फाउंडेशन, मराठा मंडळ आणि छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठान अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा मंगल कार्यालय अकोला येथे दि.३१/०५/२०२६ रविवार ला आयोजित करण्यात आलेल्या 'पाटील समाज वधु-वर परिचय मेळाव्यास' समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात शेकडो इच्छुक वधु-वरांनी व त्यांच्या पालकांनी हजेरी लावून योग्य जोडीदार निवडीच्या प्रक्रियेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी अकोला जिल्ह्याचे खासदार श्री अनुप धोत्रे तसेच अकोला पूर्वचे आमदार श्री रणधीर भाऊ सावरकर, महापौर सौ खेडकरताई , अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ .जयराज कोरपे, प्रतिष्ठित डॉक्टर, इंजिनीयर,उद्योजक, समाजसेवक तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवर, पदाधिकारी




**"आजच्या धकाधकीच्या युगात योग्य जोडीदार शोधणे पालकांसाठी मोठे आव्हान बनले आहे. समाजबांधवांना एकाच छताखाली ही संधी उपलब्ध करून देणे आणि विवाह जुळवण्यातील वेळ व पैसा वाचवणे, हाच या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे."**

**— श्री रजनीश ठाकरे पाटील मुख्य समन्वयक**

आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात डॉक्टर, इंजिनिअर, आयटी प्रोफेशनल्स, शासकीय अधिकारी तसेच उच्चशिक्षित व्यावसायिक तरुण-तरुणींची नोंदणी लक्षणीय होती. वधु-वर आणि त्यांच्या पालकांना एकमेकांशी थेट संवाद साधता यावा, यासाठी संयोजकांनी विशेष 'परिचय मंच' आणि स्वतंत्र समुपदेशन कक्षाची व्यवस्था केली होती. इच्छुक वधु वर यांचे परिचय पत्र जमा करून

विवाह इच्छुक उमेदवारांची माहिती असलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे (स्मरणिका) संकलन करून त्यांचे इ पुस्तक काढण्यात येणार आहे. आधुनिक काळाची गरज ओळखून ही माहिती डिजिटल स्वरूपातही उपलब्ध करून देण्यात आल्याने पालकांनी संयोजकांचे कौतुक केले.

पालकांमध्ये समाधानाचा सूर :

मेळाव्यात आलेल्या अनेक पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "अशा उपक्रमांमुळे आंतरजिल्हा आणि राज्यभरातील पाटील समाजातील योग्य स्थळे एकाच ठिकाणी पाहायला मिळाली. यामुळे नातेसंबंध जोडणे अधिक सोपे झाले आहे."हा मेळावा यशस्वी करण्यासाठी पाटील वेल्फेअर फाउंडेशन, मराठा मंडळ आणि छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य समन्वयकश्री रजनीश ठाकरे यांनी तर प्रभावी सूत्रसंचालन श्री अजय अरबट यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी श्री. दिनेश रावणकार यांनी आभार प्रदर्शन केले. मेळाव्यासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्व समाजबांधवांचे, कमिटी सदस्यांचे आणि उपस्थित पालक-उमेदवारांचे त्यांनी मनापासून आभार मानले. उपस्थितांसाठी चहा-पानाची व भोजनाची देखील उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

# साळावच्या कांदळवनावर घाला; प्रशासन झोपेत, पर्यावरण धोक्यात! जेएसडब्ल्यूच्या जागेवर भराव टाकून कांदळवन नष्ट करण्याचा डाव ?

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील साळाव परिसरात पर्यावरणाचा गळा घोटण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, निडी मिठेखार बंदरालगतच्या संरक्षित कांदळवन क्षेत्रावर भराव टाकून ते नष्ट करण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार मुंबई उच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशांनंतरही सुरू असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुरुड तालुका प्रचार प्रमुख प्रमोद नागोठणेकर आणि स्थानिक ग्रामस्थ राजू रामभाऊ बापलेकर यांनी या प्रकरणी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करत तातडीच्या कारवाईची मागणी केली आहे. २९ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने ही तक्रार स्वीकारली असून आता प्रशासनाची परीक्षा लागली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ग्रुप ग्रामपंचायत साळाव हद्दीतील मौजे निडी गावाच्या पूर्वेकडील भागात तसेच निडी मिठेखार बंदराच्या आतील परिसरात मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक कांदळवन अस्तित्वात आहे. हे क्षेत्र जैवविविधता, समुद्रकिनारी संरक्षण आणि पर्यावरणीय समतोलाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानले जाते. मात्र याच भागात काही घटकांकडून भराव टाकण्याचे आणि कांदळवन क्षेत्राचा मूळ स्वरूप बदलण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, तक्रारदारांनी या क्षेत्राचा संबंध जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावावर असलेल्या ७/१२ उताऱ्याशी असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ?

मुंबई उच्च न्यायालयाने ६ ऑक्टोबर २००५ रोजी दिलेलेल्या ऐतिहासिक आदेशानुसार महाराष्ट्रातील कोणतेही कांदळवन तोडणे, त्यावर भराव टाकणे किंवा त्याचे नुकसान करणे पूर्णतः बेकायदेशीर आहे. इतकेच नव्हे तर कांदळवनाच्या ५० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम करण्यासही बंदी आहे. रात्रीचे काही समाजकंट पैशाच्या हव्यासापोटी मशीन व हाताने कांदळवन कत्तल करत आहेत,

तरीही साळाव परिसरात जर प्रत्यक्षात भराव टाकण्याचे प्रकार होत असतील, तर हा केवळ पर्यावरणावरील हल्ला नसून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले जाऊ शकते, अशी कायदे तज्ज्ञांची भूमिका आहे.

प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे?

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात यापूर्वीही अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र महसूल, वन विभाग आणि स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही. पर्यावरणीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात संशयास्पद हालचाली सुरू असताना प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप का केला नाही, असा सवाल आता ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

कांदळवन हे किनारपट्टीचे नैसर्गिक कवच मानले जाते. चक्रीवादळे, समुद्री लाटा आणि किनारी धूप यापासून संरक्षण करण्याबरोबरच मत्स्यसंपदा आणि जैवविविधतेसाठीही ते जीवनरेषा आहे. अशा परिस्थितीत उद्योग, विकास किंवा इतर कोणत्याही कारणाखाली कांदळवनाची कत्तल करण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो भविष्यातील पर्यावरणीय आपत्तीला निमंत्रण ठरू शकतो.

**तक्रारदारांच्या मागण्या**

तक्रारदार प्रमोद नागोठणेकर आणि राजू बापलेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पुढील मागण्या केल्या आहेत

- महसूल आणि वन विभागाने संयुक्त पाहणी करून पंचनामा करावा.
- संबंधित कांदळवन क्षेत्राची सातबारा उताऱ्यावर स्पष्ट नोंद करावी.
- भराव टाकणाऱ्या किंवा कांदळवन नष्ट करणाऱ्या जबाबदार व्यक्ती व संस्थांवर फौजदारी कारवाई करावी.
- चौकशी व कारवाईचा अहवाल लेखी स्वरूपात उपलब्ध करून द्यावा.

न्यायालयीन अवमान याचिकेचा इशारा

"कांदळवन हे पर्यावरणाचे फुफ्फुस आहे. त्याचा विनाश कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही, तर न्यायालयीन अवमान याचिकेसह पुढील कायदेशीर लढा उभारला जाईल," असा इशारा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे तालुका प्रचार प्रमुख प्रमोद नागोठणेकर यांनी दिला आहे.

या तक्रारीसोबत उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत, संबंधित जागेचा नकाशा आणि इतर पुरावे जोडण्यात आले आहेत. आता रायगड जिल्हाधिकारी, वन विभाग आणि महसूल प्रशासन या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण मुरुड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कांदळवन वाचणार की प्रभावशाली शक्तींसमोर प्रशासन पुन्हा नतमस्तक होणार? हा प्रश्न आता जनतेच्या मनात घर करून राहिला आहे.

# प्रदूषणापेक्षा धोकादायक ठरत आहे संवेदनशीलतेचा अभाव

## पर्यावरणीय संकटामागील मानवी वर्तनाचे शांत वास्तव




आज पर्यावरणीय संकटाबद्दल चर्चा झाली की आपण प्रामुख्याने प्रदूषण, हवामान बदल, जंगलतोड, औद्योगिक वाढ किंवा शासकीय व्यवस्थेकडे बोट दाखवतो. परंतु गेल्या काही वर्षांत समाजामध्ये फिरताना, विविध पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सहभागी होताना आणि लोकांच्या दैनंदिन वर्तनाचे निरीक्षण करताना मला एक वेगळी आणि अधिक गंभीर गोष्ट जाणवली — पर्यावरणाचा ऱ्हास फक्त मोठ्या कारणांमुळे होत नाही; तो सामान्य मानवी वर्तनातूनही शांतपणे वाढत असतो .ही जाणीव अस्वस्थ करणारी होती, कारण त्यामुळे मला केवळ समाजाकडेच नव्हे तर स्वत :कडेही पाहावे लागले.

रस्त्यावर सहजपणे कचरा फेकणे, सार्वजनिक नळातून वाहणाऱ्या पाण्याकडे दुर्लक्ष करणे, पर्याय उपलब्ध असतानाही प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणे, कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर अन्न वाया घालवणे किंवा विकासाच्या नावाखाली झाडांची तोड स्वीकारणे — या घटना स्वतंत्रपणे किरकोळ वाटू शकतात. परंतु अशाच छोट्या सवयी एकत्र येऊन पर्यावरणीय असंतुलनाची मोठी समस्या निर्माण करत आहेत.

मला सर्वाधिक अस्वस्थ केले ते केवळ हे वर्तन नव्हते, तर त्या वर्तनाचे समाजामध्ये झालेले "सामान्यीकरण" होते. रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा लोकांना आता धक्का देत नाही. सार्वजनिक जागा "कोणाच्याच जबाबदारीत नसलेल्या" ठिकाणी बदलत चालल्या आहेत. आणि नकळत समाजामध्ये एक मानसिकता वाढत गेली आहे — "कोणीतरी दुसरा हे सोडवेल."

हळूहळू मला एक महत्त्वाची गोष्ट समजू लागली — पर्यावरणाचा ऱ्हास अचानक घडत नाही; तो सतत होणाऱ्या निष्काळजी वर्तनातून शांतपणे वाढत जातो .एका काळात मला वाटत होते की जागरूकता निर्माण झाली की बदल आपोआप घडेल. लोकांना प्रदूषणाचे दुष्परिणाम माहिती आहेत. प्लास्टिकमुळे होणारे नुकसान माहीत आहे. हवामान बदलाबद्दल चर्चा सुरू आहे. तरीही वर्तन मात्र फारसे बदलताना दिसत नाही.

कारण मानव केवळ ज्ञानावर वागत नाही; तो सवयींवर, सोयींवर आणि भावनिक प्राधान्यांवर वागतो.

आजच्या आधुनिक जीवनशैलीमध्ये "सोय" ही सर्वात प्रभावी शक्ती बनली आहे. लोक अनेकदा जबाबदारीपेक्षा सोप्या पर्यायाची निवड करतात. प्लास्टिकने जीवन सोपे केले. डिस्पोजेबल संस्कृती सामान्य झाली. दुरुस्तीची सवय कमी झाली आणि "नवीन घेण्याची" मानसिकता वाढली. या सगळ्यात पर्यावरणीय संवेदनशीलता हळूहळू मागे पडत गेली.

माझ्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट झाली — तांत्रिक बदल करणे सोपे असते, पण मानवी वर्तन बदलणे अत्यंत कठीण असते.

यंत्रणा बदलता येतात, धोरणे बदलता येतात, सुविधा विकसित करता येतात; पण रोजच्या सवयी बदलण्यासाठी भावनिक सहभाग आवश्यक असतो. एका स्वच्छता मोहिमेदरम्यान मी काही लोकांना सुरुवातीला केवळ औपचारिकतेपोटी सहभागी होताना पाहिले. पण जेव्हा त्यांनी प्रत्यक्ष कचरा वर्गीकरण केले, स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि आपण निर्माण करत असलेल्या कचऱ्याचे प्रमाण जवळून पाहिले, तेव्हा त्यांच्या विचारांमध्ये आणि वर्तनामध्ये बदल दिसू लागला.

काही लोकांनी कापडी पिशव्या वापरण्यास सुरुवात केली. काहींनी अनावश्यक वापराबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली. काही जण सार्वजनिक स्वच्छतेबद्दल अधिक जागरूक झाले. बदल मोठा नव्हता, पण तो खरा होता .या अनुभवातून मला एक महत्त्वाची गोष्ट समजली — लोक केवळ सूचना ऐकून बदलत नाहीत; ते भावनिक अनुभवातून बदलतात .कदाचित म्हणूनच अनेक पर्यावरणीय मोहिमा माहिती देतात, पण भावनिक जोड निर्माण करण्यात कमी पडतात. कारण माणूस ज्या गोष्टीशी भावनिकदृष्ट्या जोडला जातो, त्याचेच संरक्षण करतो.

आज आधुनिक जीवनशैलीने लोकांना अधिक व्यस्त केले आहे. आर्थिक ताण, स्पर्धा, जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक संघर्षांमध्ये अनेक जण इतके अडकलेले आहेत की पर्यावरणाविषयी विचार करणे नकळत मागे पडते. आणि समाजामध्ये एक विचार हळूहळू वाढत जातो — "कोणीतरी दुसरा हे सोडवेल."परंतु निसर्ग पुढे ढकललेल्या जबाबदाऱ्यांवर कार्य करत नाही .पाण्याची व्यवस्था दुर्लक्षाला त्वरित प्रतिसाद देते. माती शोषणाला त्वरित प्रतिसाद देते. जैवविविधता असंतुलनाला त्वरित प्रतिसाद देते. फरक इतकाच की मानवाला त्याचे परिणाम उशिरा जाणवतात. आज दिसणारे पर्यावरणीय संकट हे कदाचित अनेक दशकांपासून होत आलेल्या छोट्या, निष्काळजी आणि भावनिकदृष्ट्या तुटलेल्या निर्णयांचे एकत्रित परिणाम आहेत .मात्र या प्रवासात मला एक आशादायक गोष्टही दिसली — वर्तन बदलू शकते .हळूहळू, पण अर्थपूर्णपणे.

मी अशा लोकांना पाहिले आहे जे पूर्वी कचऱ्याकडे दुर्लक्ष करत होते आणि आज कचरा वर्गीकरणाबद्दल जागरूक झाले आहेत. मी अशा मुलांना पाहिले आहे ज्यांनी आपल्या कुटुंबांच्या सवयी बदलल्या. मी अशा समुदायांना पाहिले आहे ज्यांनी पुन्हा सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण केली .यातून आशा निर्माण होते .कारण पर्यावरणाचे भविष्य केवळ मोठ्या घोषणांवर अवलंबून नसून, सामान्य घरांमध्ये, रस्त्यांवर, शाळांमध्ये आणि समाजामध्ये घडणाऱ्या छोट्या वर्तनात्मक बदलांवरही अवलंबून आहे. माझ्यासाठी जागतिक पर्यावरण दिन २०२६ हा केवळ प्रदूषण किंवा हवामान बदलाबद्दल चर्चा करण्याचा दिवस नाही .तो मानवी वर्तनाचे शांतपणे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे .कारण कदाचित पृथ्वीचे भविष्य केवळ सरकार, तंत्रज्ञान किंवा धोरणे ठरवणार नाहीत; ते लाखो सामान्य लोकांच्या रोजच्या छोट्या निर्णयांमधूनही घडणार आहे.

आणि कदाचित खरी पर्यावरणीय जबाबदारी त्या क्षणी सुरू होते — जेव्हा माणूस हा प्रश्न विचारणे थांबवतो —"ही समस्या कोण सोडवणार?"आणि स्वत :ला विचारायला सुरुवात करतो —"या समस्येमध्ये माझा सहभाग किती प्रामाणिक आहे?"

विजयकुमार कट्टी

# पावसाळ्यात फिरण्यासाठी महाराष्ट्रातील बेस्ट ऑफ-बीट ठिकाणे



पावसाळा सुरु झाला की पर्यटकांची पावले थेट लोणावळा, खंडाळा अशा ठिकाणी वळतात. मात्र या ठिकाणी जाताना प्रचंड ट्रॅफिक आणि गर्दी असते, ज्यामुळे मूड खराब होतो. अशावेळी तुम्ही यंदाच्या मान्सूनमध्ये गर्दीपासून दूर असलेल्या आणि शांततेत निसर्गाचा आनंद घेता येईल अशा महाराष्ट्रातील ऑफ बीट ठिकाणी नक्की जाऊ शकता. चला जाणून घेऊयात पावसाळ्यात फिरण्यासाठी महाराष्ट्रातील बेस्ट ऑफ-बीट ठिकाणे

**जव्हार –**

मुंबई ठाण्यापासून काही तासांच्या अंतरावर असलेलं हे ठिकाण सध्या ट्रेकर्ससाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले आहे. येथे तुम्ही दाभोसा धबधबा आमि जयविलास पॅलेस पाहू शकता. जव्हारजवळील 'साजन' हे गाव देखील शांततेत वेळ घालवण्यासाठी उत्तम पर्याय आहे.

**तपोला –**

महाबळेश्वरच्या अगदी जवळ असलेलं तपोला गर्दी नसलेलं ठिकाण आहे. शिवसागर तवालाच्या कडेला वसलेलं हे गाव पावसाळ्यात फिरण्यासाठी उत्तम आहे.

**मोराची चिंचोली –**

शहराच्या गोंगाटापासून दूर वीकेंड घालवायचा असेल मोराची चिंचोली ठिकाण उत्तम आहे. पुण्याजवळ असलेलं हे ठिकाण ग्रामीण पर्यटनाचा उत्तम नमूना आहे. येथे पावसाची पहिली सर येताच चिंचेच्या झाडांच्या सावलीत मुक्तपणे नाचणारे मोर पाहता येतात.

**बारीगाव –**

कळसूबाईच्या पायथ्याशी असलेले बारी गाव आणि भंडारदरा येथील 'अंब्रेला फॉल्स' पावसाळ्यात सुंदर रूप धारण करतात. शांत तलाव आणि धबधब्यांच्या सानिध्यात वेळ घालवायचा असल्यास येथे नक्की जाऊ शकता.

**या गोष्टी महत्त्वाच्या –**

■ धबधबे आणि डोंगराळ भागात फिरताना पर्यटकांनी सुरक्षेचे नियम पाळावेत.

■ पाण्याचा अंदाज घेऊनच उतरण्याचा निर्णय घ्यावा.

# विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत करोडोंची विकास कामे मार्गी- सरपंच प्रमोद भिंगारकर

**दैनिक युवक आधार**
**संपादक विजय दूंद्रेकर**

**कोकण विभाग :** विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत विविध शासकीय निधीतून करोडो रुपयांची विकासकामे मार्गी लागली असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी दिली. येत्या काही काळात आणखी विकासकामे विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. डिसेंबर 2023 ते ऑगस्ट 2025 पर्यंत 67 लाख 21 हजार 701 रुपयांची विकासकामे करण्यात आली. यात गटार बांधणे, रस्ते दुरुस्ती, डांबर खडीने रस्ते दुरुस्ती, सीसीटीव्ही कॅमेरे, रस्ते कॉंक्रिटीकरण, गटार सफाई, आरसीसी पाईप गटार बांधणे, शाळा दुरुस्ती करणे यासारख्या महत्त्वाची कामांचा समावेश आहे. 2025 ते 2026 दरम्यान 97 लाख 7 हजार 218 रुपयांची विकासकामे करण्यात आली. यात विचुंबे गाढि नदीला संरक्षण भिंत बांधणे, स्मशानभूमी दुरुस्ती आणि रंगरंगोटी, पाडा पाणवठा देवी येथे पायऱ्या बांधणे, रस्ते कॉंक्रिटीकरण, चेंबर दुरुस्ती, स्मशानभूमी येथे स्वच्छतागृह बांधणे, स्ट्रीट लाईट बसवणे, शाळेची कंपाउंड वॉल दुरुस्ती, टेरेस दुरुस्ती, शाळेत शौचालय बांधणे आणि फरशी बसवणे, आरसीसी पाईप गटर बांधणे, पेवर ब्लॉक, उद्यान सुशोभीकरण, गार्डन सुशोभीकरण, स्मशानभूमी परिसर सुशोभीकरण या कामांचा समावेश आहे.



जिल्हा नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार निधी, सामाजिक विकास योजना, एमएमआरडीए अंतर्गत 11 कोटी 99 लाख 68 हजार 714 रुपयांची कामे करण्यात आली. यात विचुंबे येथील आठ कोटी रुपयांच्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आली. सध्या हा पूल वाहतुकीसाठी उपयुक्त ठरत आहे. पंधराव्या वित्त आयोगातून सीसीटीव्ही कॅमेरे, चेंबर सफाई आणि बांधकाम, पाणीपुरवठा लाईन, शौचालय, ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी, हायमास्ट बसवणे अशी 48 लाख 38 हजार 60 रुपयांची कामे करण्यात आली. नवीन पुलाचे काम सुरू असताना देखील विरोधकांनी विरोध सुरू ठेवला होता. मात्र हे काम देखील पूर्ण झाले. विचुंबे सार्वजनिक ग्रामपंचायत इलेक्शन 2023 मध्ये झालेल्या पराभवामुळे पुरुषोत्तम भोईर बिनबुडाचे आरोप करत आहे. ग्रामपंचायत विचुंबे तसेच लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर यांची बदनामी करणे व ग्रामपंचायतीच्या विकास कामांचा झंझावात बघून पुरुषोत्तम भोईरच्या पोटामध्ये उठलेल्या पोटशुलामुळे ग्रामपंचायतचा व प्रमोद भिंगारकर यांचा नाव बदनाम करणे अशा एक ना अनेक बातम्या पुरुषोत्तम भोईर लोकांना पाठवत आहे. तरीपण सर्व सुज्ञ जनतेने अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. आजपर्यंत विचुंबे हद्दीत न झालेली आणि रखडलेली अनेक कामे मार्गी लागली. रस्ते, गटारे, कॉंक्रिटीकरण ई. कामे पूर्ण झाली. विरोधकांना याचा पोटशुळ उठला आहे. चांगली कामे विचुंबे हद्दीत झालेली यांना पाहवत नाहीत, त्यामुळे ते विरोध करत आहेत. नवीन ब्रिज पूर्ण होऊन सुरू देखील झाला. ग्रामपंचायत हद्दीत 100 पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे सुरू आहेत. नुकताच ग्रामपंचायतला पहिल्यांदा 2025 मध्ये स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार देखील मिळाला. विचुंबे येथील पोलीस चौकी ते ओमकार पार्क एक, दोन, तीन कडे जाणारा रस्ता बऱ्याच वर्षानंतर पूर्ण झाला. मंगलमूर्ती सोसायटीकडे जाणारा रस्ता रखडला होता तो देखील मार्गी लागला तसेच ज्ञानेश्वर माऊलीकडे जाणारा रस्ता अडीच कोटी खर्च करून बनवण्यात आला. विचुंबे हद्दीत गार्डन देखील बनवण्यात आले. विचुंबेमध्ये स्ट्रीट लाईटसाठी सोलर पॅनल कार्यान्वित आहेत. ही सर्व कामे माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत, भारतीय जनता पार्टी विचुंबे आणि ग्रामपंचायतच्या प्रयत्नातून झाली आहेत, असेही सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी अधोरेखित केले.